प्रवचन

(भाग ३)

नमाज - उपवास

लेखक
मौलाना अबुल आला मौदूदी

अनुवाद
मुबारक हुसैन मनियार

अनुक्रमणिका

उपासना (इबादत)	४
नमाज	१२
नमाजमध्ये काय पठण केले जाते?	२०
जमाअतसह नमाज	३२
नमाज निष्प्रभ का झाली?	४३
उपवास (रोजा)	५१
उपवासाचा मूळ उद्देश	५८

उपासना (इबादत)

बंधुनो! मागील प्रवचनात मी आपल्याला 'दीन' (धर्म) व शरियतचा अर्थ समजावून दिला होता. आज मी आपणासमोर आणखी एका शब्दाचे स्पष्टीकरण करीन, ज्याचा सामान्यपणे मुस्लिम प्रयोग करीत असतात, परंतु फार थोडे लोक याचा खरा अर्थ जाणतात. हा शब्द आहे 'इबादत' म्हणजेच उपासना. महान अल्लाहने आपल्या पवित्र ग्रंथात फर्माविले आहे–

> "मी जिन्न आणि माणसांना याशिवाय कोणत्याही अन्य कामासाठी निर्माण केले नाही की त्यांनी माझी भक्ती करावी." (दिव्य कुरआन, ५१ : ५६)

या आयतीवरून असे कळते की आपला जन्म व आपल्या जीवनाचा उद्देश उपासनेशिवाय अन्य काही नाही. आता आपण कल्पना करू शकता की उपासनेचा अर्थ जाणून घेणे आपल्यासाठी किती आवश्यक आहे. जर आपल्याला याचा खरा अर्थ माहीत नसेल तर आपण तो उद्देशच पूर्ण करू शकणार नाही, ज्याच्यासाठी आपल्याला निर्माण केले आहे. जे आपल्या उद्देशाची पूर्तता करीत नाहीत ते अपयशी ठरतात. डॉक्टराने रोग्याला बरे केले नाही तर म्हटले जाते की त्याला उपचारात यश मिळाले नाही. शेतकरी जर पीक काढू शकत नाही तर म्हटले जाते की तो शेतीत अपयशी ठरला. अशाचप्रकारे जर आपण आपल्या जीवनाचा मूळ उद्देश म्हणजे 'उपासना' पूर्ण करू शकला नाहीत तर म्हटले पाहिजे की आपले संपूर्ण जीवनच अपयशी झाले. म्हणून इच्छा आहे की आपण लक्षपूर्वक उपासनेचा अर्थ ऐकून व समजून घ्यावा आणि त्याला आपल्या हृदयात स्थान द्यावे. कारण यावरच तुमच्या जीवनाचे यश व अपयश अवलंबून आहे.

उपासनेचा अर्थ

'इबादत' (उपासना) हा शब्द 'अब्द'पासून निघाला आहे. 'अब्द'चा अर्थ दास किंवा गुलाम आहे. म्हणून 'इबादत'चा अर्थ दासता किंवा गुलामी आहे. जो मनुष्य एखाद्याचा गुलाम असेल आणि जर त्याने स्वामीची गुलामासारखी सेवा केली आणि त्याच्याशी अशा तऱ्हेचा व्यवहार केला जसा आपल्या स्वामीशी केला पाहिजे तर ही गुलामी व उपासना आहे. याउलट जो मनुष्य एखाद्याचा गुलाम आहे आणि मालकापासून पुरेपूर पगारसुद्धा वसूल करतो, मग जर तो स्वामीच्या सेवेत

गुलामासारखे काम करीत नसेल तर त्याला अवज्ञा व द्रोह म्हटले जाईल. एवढेच नव्हे तर अधिक योग्य शब्दांत त्याला 'नमकहरामी' (मिठास न जागणे) म्हणतात.

आता विचार करा की स्वामीच्या समक्ष दासाप्रमाणे वागण्याची पद्धत अवलंबिण्याचा काय अर्थ आहे.

गुलामाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत.

(१) गुलामाचे हे प्रथम कर्तव्य आहे की त्याने आपल्या स्वामीलाच स्वामी समजावे, त्याने असा विचार करावा की जो माझा स्वामी आहे, जो मला अन्न देतो, जो माझे रक्षण करतो व माझ्यावर देखरेख ठेवतो, त्याच्याशी प्रामाणिक राहणे हे माझे कर्तव्य आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणी या गोष्टीस पात्र नाही की मी त्याच्याशी प्रामाणिक राहावे.

(२) गुलामाचे दुसरे कर्तव्य असे आहे की सदैव स्वामीच्या आज्ञेचे त्याने पालन करावे. त्याच्या हुकुमाप्रमाणे वागावे. त्याच्या सेवेपासून कधीही तोंड फिरवू नये. मालकाच्या इच्छेविरूद्ध स्वत: आपल्या मनाने कोणतीही गोष्ट करू नये व दुसऱ्याची गोष्टही मानू नये. गुलाम सदैव प्रत्येक स्थितीत गुलाम आहे. त्याला असे म्हणण्याचा अधिकारच नाही की स्वामीची अमुक गोष्ट ऐकेन व अमुक ऐकणार नाही किंवा इतक्या वेळेपर्यंत मी स्वामीचा गुलाम आहे आणि उरलेल्या वेळेत मी त्याच्या गुलामीतून मुक्त आहे.

(३) गुलामाचे तिसरे कर्तव्य असे आहे की त्याने स्वामीचा आदर करावा व त्याचे श्रेष्ठत्व मान्य करावे. स्वामीचा आदर व त्याचे श्रेष्ठत्व व्यक्त करण्याची जी पद्धत स्वामीने घालून दिली असेल तिचे अनुसरण करावे. स्वामीला सलामी देण्यास हजर होण्यासाठी जी वेळ दिली असेल त्या वेळी गुलामाने हजर राहावे आणि असे सिद्ध करावे की मी त्याच्याशी प्रामाणिकता व्यक्त करण्यात व आज्ञापालनात दृढ आहे.

फक्त ही तीन कर्तव्ये आहेत की ज्यांच्या संयोगाने उपासना बनते. पहिले स्वामीशी प्रामाणिक असणे, दुसरे त्याचे आज्ञापालन करणे व तिसरे त्याचा आदर करणे व श्रेष्ठत्व मान्य करणे होय.

अल्लाहने फर्माविले आहे, "मी जिन्न व माणसाला याशिवाय अन्य कशासाठी

निर्माण केले नाही की त्यांनी माझी उपासना करावी.'' तर त्याचा वास्तविक असा अर्थ आहे की महान अल्लाहने जिन्न व माणसाला अशासाठी निर्माण केले की त्यांनी केवळ अल्लाहशी प्रामाणिक असावे, त्याच्याशिवाय अन्य कोणाशी प्रामाणिक असू नये. केवळ अल्लाहच्या आज्ञांचे पालन करावे, त्याच्याशिवाय अन्य कोणाची आज्ञा पाळू नये, केवळ अल्लाहसमोर आदर व सन्मान व्यक्त करण्यासाठी नतमस्तक व्हावे, अन्य कोणापुढे नतमस्तक होऊ नये.

याच तिन्ही कर्तव्यांना अल्लाहने 'इबादत' (उपासना) या व्यापक शब्दाने संबोधले आहे. हाच अर्थ त्या सर्व आयतींचा आहे ज्यात अल्लाहने आपल्या उपासनेची आज्ञा दिलेली आहे. पैगंबर मुहम्मद (स.) व त्यांच्यापूर्वी अल्लाहने पाठविलेल्या पैगंबरांच्या सर्व शिकवणींचा सार असाच आहे,

''अल्लाहशिवाय अन्य कोणाची उपासना करू नका.'' (दिव्य कुरआन)

म्हणजे केवळ एक बादशाह आहे, ज्याच्याशी तुम्ही प्रामाणिक असणे आवश्यक आहे आणि तो बादशाह अल्लाह आहे. केवळ एक कायदा आहे, ज्याचे अनुसरण करणे तुमचे कर्तव्य आहे, तो अल्लाहचा कायदा आहे. केवळ एकच व्यक्तित्व असे आहे ज्याची तुम्ही पूजा व उपासना केली पाहिजे आणि ते व्यक्तित्व अल्लाहचे आहे.

उपासनेचा चुकीचा अर्थ काढण्याचे परिणाम

उपासनेचा हा अर्थ तुम्ही लक्षात ठेवा आणि मग माझ्या प्रश्नांची उत्तरे देत राहा.

तुम्ही त्या नोकरासंबंधी काय म्हणाल की जो मालकाने ठरवून दिलेल्या कामावर जाण्याऐवजी नेहमी केवळ त्याच्यासमोर हात बांधून उभा राहतो आणि लक्षावधी वेळा त्याच्या नामाचा जप करीत राहतो?

मालक त्याला म्हणतो, ''जाऊन अमुक अमुक माणसांचे अधिकार त्यांना दे.''

परंतु तो जात नाही तर उभ्या उभ्या दहा वेळा मालकाला नमस्कार करतो आणि पुन्हा हात बांधून मालकासमोर उभा राहतो.

मालक त्याला आज्ञा देतो, ''जा आणि अमुक अमुक वाईट गोष्ट नष्ट कर.''

परंतु तो एक इंचभरसुद्धा जागेवरून हलत नाही आणि साष्टांग नमस्कारावर

नमस्कार (सजदे) करीत राहतो.

मालक आज्ञा देतो, ''जा आणि चोराचे हात कापून टाक.''

ही आज्ञा ऐकून फक्त तेथेच उभा राहून अत्यंत मधुर आवाजात अनेक वेळा पठण करीत राहतो, ''चोराचे हात कापा, चोराचे हात कापा!''

परंतु एकदासुद्धा ती राज्यव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत नाही की ज्यात चोराचे हात कापले जाऊ शकतील. काय तुम्ही असे म्हणू शकता की हा नोकर वास्तविकत: मालकाची चाकरी करीत आहे? जर तुमच्या एखाद्या नोकराने असा व्यवहार केला तर मला कल्पना नाही की तुम्ही त्याला काय म्हणाल. परंतु मला आश्चर्य वाटते की अल्लाहचा जो नोकर असे करतो त्याला तुम्ही मोठा उपासक म्हणता! हा अत्याचारी सकाळपासून संध्याकाळपर्यंत न जाणो किती वेळा पवित्र कुरआनमध्ये अल्लाहच्या आदेशांचे वाचन करतो, परंतु त्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी जागेवरून हलतसुद्धा नाही, तर नफीलवर नफील नमाज (अशी नमाज जी अदा केली नाही तरी चालते) अदा करीत राहतो. सहस्त्रावधी मण्यांच्या 'तसबीह' (जपमाळा) वर अल्लाहचे नाव जपत राहतो आणि मधुर आवाजात पवित्र कुरआनचे पठण करीत राहतो.

तुम्ही त्याच्या या कृती पाहता आणि म्हणता, ''कसा महान भक्त व उपासक आहे!''

हा गैरसमज केवळ अशासाठी आहे की तुम्हाला 'इबादत'चा (उपासनेचा) खरा अर्थ माहीत नाही.

आणखी एक नोकर आहे जो रात्रंदिवस चाकरी तर दुसऱ्यांची करतो, आज्ञा दुसऱ्यांच्या ऐकतो आणि मानतो, दुसऱ्यांच्या कायद्याची अंमलबजावणी करतो आणि स्वत:च्या खऱ्या मालकाच्या आदेशाविरूद्ध वागतो; परंतु सलामी देण्याच्या वेळी मालकासमोर उपस्थित होतो आणि जिभेने मालकाच्याच नावाचा जप करतो. जर तुमच्यापैकी एखाद्या माणसाच्या नोकराने या पद्धतीचा अवलंब केला तर तुम्ही काय कराल? काय तुम्ही त्याची सलामी त्याच्या तोंडावर फेकून मारणार नाही?

जेव्हा तो जिभेने तुम्हाला स्वामी व मालक म्हणेल तर काय तुम्ही लगेच असे उत्तर देणार नाही का, ''तू पराकोटीचा खोटा आणि बेईमान आहेस, पगार तर

माझ्याकडून घेतोस आणि नोकरी मात्र दुसऱ्यांची करतोस. जिभेने तर मला मालक म्हणतोस आणि वास्तविकपणे माझी सोडून प्रत्येकाची सेवा करीत फिरतोस?"

ही तर एक सामान्य बुद्धीची गोष्ट आहे जी आपल्यापैकी प्रत्येक मनुष्य समजू शकतो. परंतु किती आश्चर्याची गोष्ट आहे की जे लोक रात्रंदिवस अल्लाहचा कायदा मोडतात, नास्तिक व अनेकेश्वरवाद्यांच्या आदेशांची अंमलबजावणी करतात आणि आपल्या जीवनाच्या बाबतीत अल्लाहच्या आज्ञेची काही पर्वा करीत नाहीत, तरीसुद्धा तुम्ही त्यांच्या नमाज, रोजे (उपवास), तसबीह (नामस्मरण) व पवित्र कुरआनचे पठण, हज (मक्का व मदीनाची तीर्थयात्रा) आणि जकात (संपत्तीवर अडीच टक्क्यांप्रमाणे दान) देण्यास अल्लाहची उपासना समजता. हा गैरसमजदेखील याच कारणामुळे आहे की आपल्याला 'इबादत' (उपासना) या शब्दाचा खरा अर्थ माहीत नाही.

आणखी एका नोकराचे उदाहरण घ्या. मालकाने त्याच्या नोकरासाठी जो गणवेश निश्चित केला आहे, तो योग्य प्रकारे व व्यवस्थितपणे परिधान करतो. मोठा आदर व सन्मान दर्शवीत तो मालकाच्या सेवेत उपस्थित राहतो. प्रत्येक आज्ञा ऐकून वाकून 'शिरसावंद्य' असे म्हणतो, जणू त्याच्याशिवाय अन्य कोणताही नोकर त्याच्यापेक्षा अधिक आज्ञाधारक नाही. सलामीच्या वेळी सर्वांच्या पुढे जाऊन उभा राहतो आणि मालकाच्या नावाचा जप करण्यात सर्व नोकरांना पाठीमागे टाकतो. परंतु दुसरीकडे हाच नोकर मालकाच्या शत्रू व द्रोही मंडळींची सेवा करतो, मालकाविरूद्ध त्यांच्या कट-कारस्थानात भाग घेतो आणि मालकाच्या नावाचे जगातून उच्चाटन करण्यासाठी जे जे प्रयत्न ते करतात त्यात हा दुर्दैवी त्यांना सहकार्य करतो. रात्रीच्या अंधारात तर मालकाच्या घरात घरफोडी करतो आणि सकाळी अत्यंत प्रामाणिक नोकरासमान हात बांधून मालकाच्या सेवेत हजर राहतो. असल्या नोकरासंबंधी तुम्ही काय म्हणाल? असेच ना की तो ढोंगी आहे, द्रोही आहे, मिठाला न जागणारा आहे. परंतु अल्लाहचे जे नोकर असे आहेत त्यांना तुम्ही काय म्हणता? कोणाला पीरसाहेब (साधू, संत), कोणाला मौलानासाहेब (धर्मगुरू) व कोणाला धार्मिक, अल्लाहचे भय बाळगणारा व उपासक म्हणता. याचे कारण असे आहे की त्यांच्या चेहऱ्यावर पूर्ण मापाच्या दाढ्या पाहून, त्यांच्या घोट्यापासून दोन-दोन इंच वर असलेल्या विजारी पाहून, त्यांच्या कपाळावर नमाजचे पडलेले घट्टे आणि त्यांच्या दीर्घकाळ चालणाऱ्या नमाज व जाडजूड जपमाळा (तसबीह) पाहून आपल्याला असे वाटते की ते मोठे

धार्मिक व उपासक आहेत. या गैरसमजुतीचेसुद्धा हेच कारण आहे की आम्ही उपासना व धार्मिकतेचा अर्थच चुकीचा काढला आहे.

आम्हाला वाटते की हात बांधून किबल्याकडे (ज्या मस्जिदीकडे तोंड करून जगातील मुस्लिम लोक नमाज अदा करतात) तोंड करून उभे राहणे, गुडघ्यावर हात ठेवून वाकणे, जमिनीवर हात टेकून 'सजदा' (साष्टांग नमस्कार) करणे आणि काही ठराविक शब्दांचा जिभेने उच्चार करणे, केवळ याच काही कृती व हालचाली म्हणजे उपासना आहे. आम्हाला असे वाटते की रमजान महिन्याच्या पहिल्या तारखेपासून शव्वाल महिन्याचे चंद्रदर्शन होईपर्यंत दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत उपाशी तापाशी व तहानलेले राहण्याचे नाव उपासना आहे. आम्हाला असे वाटते की पवित्र कुरआनच्या काही रुकूअचे (परिच्छेदांचे) तोंडाने पठण करण्याचे नाव उपासना आहे. आपली अशी समजूत आहे की 'मक्का' नावाच्या प्रतिष्ठित शहरात जाऊन किबल्याच्या सभोवताली प्रदक्षिणा करण्याचे नाव उपासना आहे.

सारांश, आम्ही काही कृतींच्या बाह्य स्वरूपांचे नाव 'उपासना' ठेवून टाकले आहे आणि जेव्हा एखादा मनुष्य या पद्धतीने या कृती करतो तेव्हा आम्हाला वाटते की त्याने अल्लाहची उपासना केली आणि "वमा ख़लक़तुल जिन्ना वल इन्सा इल्ला लियअबुदून"चा उद्देश पूर्ण झाला. आता त्याला जीवनात स्वातंत्र्य आहे की त्याने हवे ते करावे.

इबादत - संपूर्ण जीवनभर गुलामी

सत्यस्थिती अशी आहे की अल्लाहने ज्या 'इबादत' (उपासने) साठी आम्हाला निर्माण केले आहे आणि ज्याची आम्हाला आज्ञा दिली आहे ती काही वेगळीच गोष्ट आहे. ती उपासना अशी आहे की तुम्ही तुमच्या जीवनात सदैव कोणत्याही परिस्थितीत अल्लाहच्या आज्ञेचे पालन करावे आणि त्या प्रत्येक कायद्याचे पालन करू नये जो अल्लाहच्या कायद्याविरूद्ध असेल. आपली प्रत्येक हालचाल त्या सीमेच्या आत असावी जी आपल्याला ठरवून दिलेली आहे. तुमचे प्रत्येक कृत्य त्या पद्धतीप्रमाणे असावे जी अल्लाहने दाखविली आहे. जर त्या पद्धतीनुसार तुम्ही तुमचे जीवन व्यतीत केले तर जीवन पूर्णपणे उपासना ठरेल. असल्या जीवनात आपले झोपणे, जागणे, खाणे, पिणे, चालणे-फिरणे आणि बोलणेसुद्धा उपासना ठरेल. एवढेच नव्हे तर पत्नीशी संभोग करणे आणि मुलाबाळांना प्रेम करणेसुद्धा उपासना ठरेल. ज्या कामांना तुम्ही अगदी

ऐहिकता म्हणता ते सर्व धार्मिकता व उपासना आहेत. तुम्ही जर कामे करण्यात अल्लाहने ठरवून दिलेल्या हद्दींचे भान ठेवले आणि जीवनात पावलोपावली हे पाहिले की अल्लाहच्या दृष्टीने काय मान्य आहे आणि काय अमान्य आहे? धर्मसंमत काय आहे आणि धर्माने काय निषिद्ध ठरविले आहे? कोणत्या गोष्टीवर अल्लाह प्रसन्न होतो आणि कोणत्यावर अप्रसन्न? उदाहरणार्थ- तुम्ही रोजी कमविण्यासठी बाहेर पडता. या कामात असले अनेक प्रसंग येतात, ज्यात धर्म निषिद्ध माल अगदी सहजपणे आपल्याला प्राप्त होऊ शकतो. जर तुम्ही अल्लाहचे भय बाळगून तो माल घेतला नाही आणि केवळ धर्मसंमत भाकरी कमवून आणली तर हा जितका अवधी भाकरी कमविण्यासाठी तुम्ही खर्च केला आहे ती सर्व उपासना होती. ही भाकरी जी तुम्ही घरी आणून स्वत: खाल्ली व पत्नी आणि मुलाबाळांना व अल्लाहने ठरवून दिलेल्या हक्कदारांना खाऊ घातली, या सर्व कृत्यांसाठी तुम्ही चांगले फळ व पुण्य प्राप्त करण्यास पात्र झालात. जर तुम्ही रस्त्याने जात असता रस्त्यावरील दगड व काटे या विचाराने उचलून बाजूला टाकले की अल्लाहच्या दासांना त्यापासून त्रास होऊ नये तर हीसुद्धा उपासना होय. तुम्ही जर एखाद्या आजारी माणसाची सेवा केली अथवा एखाद्या आंधळ्याला रस्त्यावरून चालण्यासाठी साहाय्य केले अथवा एखाद्या संकटग्रस्त माणसाला मदत केली, तर हीदेखील उपासना आहे. तुम्ही जर बोलण्यात असत्य, निंदा, एखाद्याबद्दल अपशब्द बोलणे व मन दुखविण्यासारख्या गोष्टी न करण्याचे पथ्य पाळले आणि अल्लाहचे भय बाळगून केवळ सत्यवचनी राहिला तर जितका काळ तुम्ही संभाषणात घालविला तो सर्व काळ उपासनेत खर्च झाला.

म्हणून अल्लाहची खरी भक्ती ही आहे की वयात आल्यापासून मृत्यू येईपर्यंत तुम्ही अल्लाहच्या कायद्याप्रमाणे चालावे आणि त्याच्या आज्ञेप्रमाणे जीवन जगावे. या भक्तीसाठी कोणतीही वेळ ठरलेली नाही. ही उपासना प्रत्येक वेळी केली पाहिजे. या उपासनेचे कोणतेही निश्चित स्वरूप नाही. प्रत्येक कार्यात व प्रत्येक स्थितीत त्याचीच उपासना केली पाहिजे. जर तुम्ही असे सांगू शकत नाही की मी अमुक वेळी अल्लाहचा दास आहे आणि अमुक वेळी त्याचा दास नाही, तर तुम्ही असेदेखील सांगू शकत नाही की अमुक वेळ अल्लाहच्या गुलामी व उपासनेसाठी नाही.

बंधुनो! तुम्हाला उपासनेचा अर्थ कळला आणि हेदेखील कळले की जीवनात सदैव सर्व परिस्थितीत अल्लाहची गुलामी व आज्ञापालन करण्याचेच नाव उपासना आहे. आता तुम्ही विचारता की ही नमाज, रोजा व हजसारख्या गोष्टी काय आहेत?

याचे उत्तर असे आहे की मूलत: या उपासना ज्या अल्लाहने आम्हासाठी अनिवार्य केल्या आहेत त्यांचा उद्देश आम्हाला त्या मोठ्या उपासनेसाठी तयार करणे होय, जी आपल्याला जीवनात नेहमी कोणत्याही परिस्थितीत केली पाहिजे. नमाज आम्हाला दिवसातून पाच वेळा आठवण करून देते की आम्ही अल्लाहचे गुलाम आहोत. त्याचीच गुलामी आम्हाला केली पाहिजे. वर्षभरात एकदा सलग एक महिनाभर रोजा (उपवास) आम्हाला याच सेवा व गुलामीसाठी तयार करतो. जकात आम्हाला वारंवार स्मरण करून देते की ही जी संपत्ती आम्ही कमविली आहे ही अल्लाहची देणगी आहे. ही केवळ आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी खर्च करू नका, तर आपल्या मालकाचा त्यातील हक्क अदा करा. हज (मक्का व मदीनाची तीर्थयात्रा) मनावर अल्लाहच्या प्रेमाची व त्याच्या श्रेष्ठत्वाची अशी छाप बसविते की एकदा जर ती बसली तर आयुष्यभर तिचा झालेला परिणाम मनातून दूर होत नाही. या सर्व उपासना केल्यानंतर जर तुम्ही या योग्य झाला की आपले संपूर्ण जीवन अल्लाहची उपासना बनून राहावे तर नि:संशय तुमची नमाज खऱ्या अर्थाने नमाज आहे आणि रोजा (उपवास) रोजा आहे. जकात जकात आहे व हज हज आहे. परंतु जर हा उद्देश पूर्ण झाला नाही तर केवळ रुकूअ व सजदा करण्याने (नमाज अदा केल्याने) आणि भुकेलेल्या व तहानलेल्या स्थितीत दिवस घालविण्याने व हजचे विधी पार पाडण्याने किंवा जकातची रक्कम वाटल्याने काहीही प्राप्त होणार नाही. या दर्शनी पद्धतींचे उदाहरण असे आहे की जर शरीरात प्राण आहे व मनुष्य चालत-फिरत काम करीत आहे तर नि:संशय तो एक जिवंत मनुष्य आहे, परंतु जर त्यात प्राणच नसेल तर तो एक मृत शव आहे. शवाचे हात-पाय, डोळे, नाक सर्व काही असतात; परंतु त्यात प्राणच नसतो, म्हणून तुम्ही त्याला मातीत पुरता. अशाचप्रकारे जर नमाजच्या सर्व कृती पूर्ण केल्या अथवा उपवासाच्या अटी पूर्ण केल्या; परंतु त्यात अल्लाहचे भय, त्याच्याबद्दल प्रेम आणि त्याच्याशी प्रामाणिकपणा व आज्ञापालन नसेल की ज्याच्यासाठी नमाज व रोजा अनिवार्य केले गेले आहेत, तर तीसुद्धा एक निष्प्राण वस्तू बनून राहील.

आगामी प्रवचनात मी तुम्हाला तपशीलाने सांगेन की ज्या उपासना (इबादतें) अनिवार्य केल्या गेल्या आहेत त्यांच्यापैकी प्रत्येक कशाप्रकारे त्या मोठ्या उपासनेसाठी माणसाला तयार करतात आणि जर त्या उपासना समजून केल्या आणि त्यांचा मूळ उद्देश पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तर आपल्या जीवनावर त्याचा काय परिणाम होऊ शकतो?

नमाज

बंधुनो! मागील प्रवचनात मी आपल्यासमोर उपासनेचा खरा अर्थ विषद केला होता आणि वायदा केला होता की इस्लाममध्ये ज्या उपासना अनिवार्य केल्या गेल्या आहेत त्यांच्यासंबंधी माहिती देईन की या उपासना कशाप्रकारे माणसाला त्या मोठ्या व खऱ्या उपासनेसाठी तयार करतात ज्याच्यासाठी अल्लाहने जिन्न व माणसाला निर्माण केले. या बाबतीत सर्वांत मोठी आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट नमाज आहे. आजच्या प्रवचनात केवळ याचसंबंधी आपणास काही सांगेन.

उपासनेचा व्यापक अर्थ

हे तर आम्हाला ज्ञात झाले असेल की उपासना मुळात गुलामीला म्हणतात. ज्याअर्थी आम्ही अल्लाहचे दास म्हणूनच जन्माला आलेलो आहोत त्याअर्थी आम्ही कोणत्याही वेळी कोणत्याही स्थितीतदेखील त्याच्या गुलामीतून मुक्त होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे आपण असे सांगू शकत नाही की इतके तास अथवा इतक्या मिनिटांसाठी मी अल्लाहचा दास आहे आणि इतर वेळी मी अल्लाहचा दास नाही; तसेच हेदेखील सांगू शकत नाही की मी इतका काळ अल्लाहच्या उपासनेत खर्च करीन आणि बाकीच्या वेळेत मला स्वातंत्र्य आहे की मी हवे ते करावे. आम्ही तर अल्लाहचे जन्मजात गुलाम आहोत. त्याने आपल्याला गुलामीसाठीच निर्माण केले आहे. म्हणून आपले संपूर्ण जीवन त्याच्या उपासनेत व्यतीत झाले पाहिजे आणि कधीही का क्षणासाठीदेखील आम्ही त्याच्या उपासनेपासून गाफील राहता कामा नये.

हेसुद्धा मी तुम्हाला सांगितले आहे की उपासना म्हणजे जगातील कामधंदे सोडून एका कोपऱ्यात बसणे आणि "अल्लाह अल्लाह"चा जप करणे नव्हे, तर खरोखर उपासनेचा अर्थ असा आहे की या जगात तुम्ही जे काही कराल ते अल्लाहच्या कायद्यानुसार करावे. आपले झोपणे व जागणे, खाणे-पिणे, चालणे-फिरणे, थोडक्यात सर्व काही अल्लाहच्या कायद्यानुसार घडावे. तुम्ही जेव्हा पत्नी, मुले, भाऊ-बहिणी आणि आप्तेष्ट-नातेवाईक यांच्या सान्निध्यात असाल तेव्हा त्यांच्याशी असा व्यवहार करा जसा अल्लाहने आदेश दिला आहे. जेव्हा मित्रमंडळीत हसाल-बोलाल, तेव्हादेखील आपल्याला याचे भान राहावे की आम्ही अल्लाहच्या गुलामीपासून मुक्त नाही. जेव्हा रोजी कमविण्यास निघाल आणि लोकांशी देवाण-घेवाण कराल तेव्हासुद्धा

एक एक गोष्ट आणि एक एक कामात अल्लाहच्या आदेशांचा विचार करावा आणि कधीही त्या सीमेचे उल्लंघन करू नये जी अल्लहने ठरवून दिली आहे. जेव्हा तुम्ही रात्रीच्या अंधारात असाल व एखादे पाप असे करू शकाल की जगातील कोणीही पाहणारा नसेल तेव्हादेखील तुम्हाला या गोष्टीचे स्मरण असावे की अल्लाह पाहत आहे आणि ज्याचे भय बाळगावे असा तो आहे, जगातील लोक नव्हेत. जर तुम्ही जंगलातून एकटेच जात असला आणि तेथे एखादा अपराध अशाप्रकारे करू शकता की कोणत्याही पोलिसाला किंवा कोणत्याही साक्षीदाराला त्याचा मागमूसही लागणार नाही. अशा वेळीदेखील अल्लाहची आठवण करून भयभीत व्हावे आणि अपराध करण्यापासून परावृत्त व्हावे. जर तुम्ही असत्य, बेईमान व अत्याचाराने खूप लाभ प्राप्त करू शकता आणि कोणीही प्रतिबंध करणारा नसेल तर त्या वेळीसुद्धा तुम्ही अल्लाहला भ्यावे आणि तो लाभ अशासाठी सोडून द्यावे की अल्लाह त्यामुळे अप्रसन्न होईल. समजा सत्य व प्रामाणिकपणामुळे हानी पोहचत असेल तरीसुद्धा तुम्ही नुकसान उचलण्यास तत्पर व्हावे, केवळ यासाठी की अल्लाह त्यामुळे खूश होईल. सारांश असा की जगाचा त्या करून कोपऱ्यात व कोनाड्यात जाऊन बसणे व जपमाळा फिरवीत राहणे म्हणजे उपासना नव्हे, तर जगातील धंद्यात गुरफटून अल्लाहच्या कायद्यांचे पालन करणे म्हणजे उपासना होय. अल्लाहच्या नामस्मरणाचा अर्थ असा नव्हे की जिभेवर अल्लाहचा नामोच्चार चालू राहावा, तर वास्तविक नामस्मरण याला म्हणतात की जगातील सर्व प्रकारच्या व्यवहारात अडकूनदेखील आपल्याला नेहमी अल्लाहचे स्मरण राहावे. ज्या गोष्टी माणसाला अल्लाहपासून गाफील करणाऱ्या आहेत त्यात गुंतून जाऊनदेखील अल्लाहशी गाफील राहू नये. जगातील जीवनात जेव्हा अल्लाहचा कायदा मोडण्यायोग्य अनेक प्रसंग मोठमोठ्या लाभाची लालसा व नुकसानीची भीती घेऊन येतात तेव्हा अल्लाहचे स्मरण करा आणि त्याच्या कायद्याचे पालन करण्यावर टिकून राहा. हे आहे अल्लाहचे खरे स्मरण. याचे नाव आहे 'अल्लाहचे नामस्मरण'. याच नामस्मरणाकडे पवित्र कुरआनमध्ये इशारा केला गेला आहे-

> "मग जेव्हा नमाज पूर्ण होईल तेव्हा भूतलावर पसरले जा आणि अल्लाहच्या कृपाप्रसादाचा शोध घ्या. आणि अल्लाहचे मोठ्या प्रमाणात स्मरण करीत राहा कदाचित तुम्हाला सफलता प्राप्त होईल." (दिव्य कुरआन, ६२ : १०)

नमाजपासून फायदे

उपासनेचा हा अर्थ लक्षात ठेवा आणि विचार करा की एवढी महान उपासना करण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे आणि नमाज कशाप्रकारे त्या सर्व गोष्टी माणसात निर्माण करते.

गुलामीची भावना

सर्वप्रथम तर या गोष्टीची आवश्यता आहे की आम्हाला याची वारंवार आठवण करून दिली जावी की आम्ही अल्लाहचे दास आहोत आणि त्याचीच गुलामी आम्हाला सदैव प्रत्येक कामात करावयाची आहे.

याची आठवण करून देण्याचे कारण असे की एक शैतान माणसाच्या मनात बसलेला आहे जो प्रत्येक वेळी सांगत असतो, "तू माझा गुलाम आहेस."

याशिवाय लक्षावधी व कोट्यवधी शैतान जगात सर्वत्र पसरलेले आहेत व त्यांच्यापैकी प्रत्येकजण असेच म्हणतो, "तू माझा गुलाम आहेस."

या शैतानांचा जादू तोपर्यंत निष्प्रभ होऊ शकत नाही जोपर्यंत माणसाला दिवसातून अनेक वेळा याची आठवण करून दिली जात नाही, "तू कोणाचा दास नाहीस, तू तर केवळ अल्लाहचा दास आहेस."

हेच काम नमाज करते. सकाळी उठल्याबरोबर सर्व कामांच्या अगोदर ती याच गोष्टीची आठवण करून देते. मग जेव्हा तुम्ही दिवसा आपल्या कामात मग्न असता तेव्हा पुन्हा तीन वेळा याचीच आठवण ताजी करते. तुम्ही जेव्हा रात्री झोपावयास जाता त्याच्या अगोदर एकदा त्या आठवणीची उजळणी करते. हा नमाजचा पहिला लाभ आहे. म्हणूनच पवित्र कुरआनमध्ये नमाजला 'ज़िक्र' (आठवण) म्हणून संबोधले आहे, म्हणजे हे अल्लाहचे स्मरण होय.

कर्तव्यपरायणता

याशिवाय ज्याअर्थी आपल्याला याच जीवनात पावलोपावली अल्लाहच्या आज्ञांची अंमलबजावणी करावयाची आहे त्याअर्थी हेदेखील आवश्यक आहे की कर्तव्य ओळखण्याचे गुण उत्पन्न व्हावेत आणि त्याचबरोबर कर्तव्य तत्परतेने पूर्ण करण्याची सवयसुद्धा व्हावी. ज्या माणसाला याची जाणीवच नसेल की कर्तव्याचा अर्थ काय आहे

तो तर कधीही आदेशांचे पालन करूच शकत नाही. दुसरा तो मनुष्य ज्याला कर्तव्याचा अर्थ तर माहीत असावा, परंतु त्याचे प्रशिक्षण इतके निकृष्ट असावे की कर्तव्याला कर्तव्य जाणूनसुद्धा ते पूर्ण करण्याची त्याने पर्वा करू नये, त्याच्याकडून ही अपेक्षा केली जाऊ शकत नाही की रात्र आणि दिवसाच्या चोवीस तासांत ज्या हजारो आज्ञा दिल्या जातील त्यांची अंमलबजावणी तो तत्परतेने करील.

आज्ञापालनाचा सराव

ज्या लोकांना सैन्यात अथवा पोलीस दलात नोकरी करण्याचा प्रसंग आला असेल त्यांना कल्पना आहे की या दोन्ही नोकऱ्यांमध्ये कर्तव्य समजून घेणे व ते पूर्ण करण्याचा सराव कशाप्रकारे करवून घेतला जातो. रात्र आणि दिवसात कित्येक वेळा बिगुल वाजविला जातो आणि शिपायांना एकत्र गोळा होण्याची आज्ञा दिली जाते आणि त्यांच्याकडून कवायत करवून घेतली जाते. हे सर्व अशासाठी करवून घेतले जाते की त्यांना आज्ञांचे पालन करण्याची सवय व्हावी आणि त्यांच्यापैकी जे लोक असे आळशी व अपात्र असतील जे बिगुलचा आवाज ऐकूनसुद्धा घरात बसून राहतील अथवा कवायतीत आज्ञेप्रमाणे कृती न करतील त्यांना अगोदरच निकामी समजून नोकरीवरून काढून टाकतात. अगदी अशाचप्रकारे नमाजसुद्धा दिवसातून पाच वेळा बिगुल वाजविते जेणेकरून अल्लाहच्या शिपायांनी ते ऐकून सर्व बाजूने धावत यावे आणि हे सिद्ध करावे की ते अल्लाहच्या आज्ञा पाळण्यासाठी तयार आहेत. जो मुस्लिम बिगुल ऐकूनसुद्धा बसून राहतो आणि एका जागेवरून हलत नाही तो वास्तविकत: असे सिद्ध करतो की एक तर त्याला कर्तव्याची जाणीव नाही अथवा जर जाणीव असेल तर तो इतका नालायक व निकृष्ट आहे की अल्लाहच्या सेवेत राहण्यास अयोग्य आहे.

म्हणूनच पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्माविले,

“जे लोक अजानचा आवाज ऐकून आपल्या घरातून बाहेर पडत नाहीत मला वाटते की जाऊन त्यांच्या घराला आग लावावी.”

हेच कारण आहे की हदीसमध्ये नमाजला कुफ्र (नास्तिकता) व इस्लाममधील फरकाचे कारण ठरविले आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काळात व ‘सहाबां’च्या (पैगंबरांच्या सोबत्यांच्या) काळात कोणताही असा मनुष्य मुस्लिमच समजला जात नसे जो नमाजसाठी जमाअत (समुदाय) मध्ये सामील होत नसे. येथपावेतो की ‘मुनाफिकीन’

(ढोंगी) सुद्धा ज्यांना याची गरज भासत असे की त्यांना मुस्लिम समजले जावे, त्यांनादेखील जमाअतसह नमाजमध्ये सामील होणे भाग पडत असे. म्हणून पवित्र कुरआनमध्ये ज्या गोष्टींसाठी 'मुनाफिकीन'ना धिक्कारले गेले आहे ती अशी नाही की 'ते नमाज अदा करीत नसत' तर ती अशी आहे की 'अत्यंत नाविलाजाने व वाईट मनाने ते नमाजसाठी उठत असत.'

"हे ढोंगी नमाजसाठी उठतात तर आळसावलेले, केवळ लोकांना दर्शविण्यासाठी उठतात आणि अल्लाहचे क्वचितच स्मरण करतात."

(दिव्य कुरआन, ४ : १४२)

यावरून हे कळते की इस्लाममध्ये कोणत्याही अशा माणसाला मुस्लिम समजले जाण्यास वाव नाही की जो नमाज अदा करीत नसेल. त्याला कारण असे की इस्लाम केवळ एक श्रद्धेची बाब नव्हे तर कृतीची बाब आहे आणि कृतीची बाबसुद्धा अशी की जीवनात नेहमी प्रत्येक क्षणी एका मुस्लिमाने इस्लामच्या आदेशानुसार कृती करणे आणि कुफ्र (नास्तिकता) व असत्याशी लढणे आवश्यक आहे. अशा जबरदस्त व्यावहारिक जीवनासाठी आवश्यक आहे की मुस्लिमाने अल्लाहच्या आज्ञांचे पालन करण्यासाठी नेहमी तत्पर राहावे. जो मनुष्य अशाप्रकारची तयारी ठेवीत नाही तो इस्लामसाठी पूर्णतः निरुपयोगी आहे. म्हणूनच दिवसातून पाच वेळेची नमाज अनिवार्य केली गेली आहे की जेणेकरून जे लोक मुस्लिम असण्याचा दावा करतात त्यांची पुन्हा पुन्हा परीक्षा घेतली जावी की ते खरोखर मुस्लिम आहेत किंवा नाहीत आणि खरोखर या व्यावहारिक जगात अल्लाहचे आदेश अंमलात आणण्यासाठी तयार आहेत किंवा नाहीत. जर अल्लाहच्या परेडचा बिगुल ऐकून ते हलत नाहीत तर हे स्पष्टपणे ज्ञात होते की ते इस्लामच्या व्यावहारिक जीवनासाठी तयार नाहीत. याउपर त्यांचे अल्लाहला मानणे निव्वळ निरर्थक आहे. म्हणून पवित्र कुरआनमध्ये सांगितले आहे-

"संयम व नमाजाचे साहाय्य घ्या. निःसंशय नमाज हे अत्यंत कठीण कर्म आहे. परंतु त्या सेवकांसाठी कठीण कर्म आहे. परंतु त्या सेवकांसाठी कठीण नाही."

(दिव्य कुरआन, २ : ४५)

अल्लाहचे भय निर्माण करणे

तिसरी गोष्ट अल्लाहचे भय आहे जे प्रत्येक क्षणी हृदयात ताजे असणे आवश्यक आहे. मुस्लिम तोपर्यंत इस्लामप्रमाणे कर्म करू शकत नाही जोपर्यंत त्याला विश्वास होत नाही की अल्लाह सदैव व सर्वत्र त्याला पाहत आहे, त्याच्या प्रत्येक हालचालीचे अल्लाहला ज्ञान आहे. अल्लाह अंधारातदेखील त्याला पाहत आहे, एकांतपणीदेखील अल्लाह त्याच्या समवेत आहे, सर्व जगाच्या दृष्टीपासून लपणे शक्य आहे, परंतु अल्लाहपासून लपणे शक्य नाही. जगातील सर्व शिक्षांपासून मनुष्य वाचू शकतो, परंतु अल्लाहच्या शिक्षेपासून वाचणे असंभव आहे. हाच विश्वास माणसाला अल्लाहच्या आज्ञांचे उल्लंघन करण्यापासून रोखतो. याच विश्वासामुळे तो अल्लाहने 'हलाल' (धर्मसंमत) व 'हराम' (निषिद्ध) च्या जीवनाच्या व्यवहारात आखून दिलेल्या सीमांचा आदर करण्यास बाध्य होतो. जर हा विश्वास निर्बळ झाला तर मुस्लिम खऱ्या अर्थाने मुस्लिमाप्रमाणे जीवन जगूच शकत नाही. म्हणूनच अल्लाहने दिवसात पाच वेळची नमाज अनिवार्य केली आहे जेणेकरून तिने हा विश्वास मनात वारंवार दृढ करीत राहावे. अशा तऱ्हेने अल्लाहने पवित्र कुरआनमध्ये नमाजमधील विवेक स्पष्ट केला आहे-

"निश्चितच नमाज, अशलील व अपकृत्यांपासून रोखते."

(दिव्य कुरआन, २९ : ४५)

याचे कारण तुम्ही स्वत: विचार करून समजू शकता. उदाहरणार्थ- तुम्ही नमाजला शुचिर्भूत होऊन व वुजू (नमाजसाठी हात, पाय, तोंड वगैरे धुणे) करून येता. जर तुम्ही अपवित्र असाल व स्नान न करता आला अथवा आपले कपडे अपवित्र असतील आणि तेच घालून आला किंवा वुजू केलेली नसेल आणि तुम्ही असे म्हटले की "मी वुजू केली आहे." तर जगात आपणास कोण पकडू शकेल? परंतु तुम्ही असे करीत नाही, का? अशासाठी की तुम्हास खात्री आहे की अल्लाहपासून हे पाप लपू शकत नाही. अशाचप्रकारे नमाजमध्ये ज्या बाबींचे मनातल्या मनात पठण केले जाते त्यांचे पठण जर तुम्ही केले नाही तर ते कोणालाही कळणार नाही. परंतु तुम्ही कदापि असे करीत नाही, असे का? त्याला कारण असे की आपल्याला खात्री आहे की अल्लाह सर्व काही ऐकत आहे आणि तो अधिक जवळ आहे. अशाचप्रकारे आपण जंगलातसुद्धा नमाज अदा करता. जेव्हा घरात एकटेच असता तेव्हासुद्धा नमाज अदा

करता. त्या वेळी वास्तविकत: कोणीही पाहणारा नसतो आणि कोणालाही कळत नाही की तुम्ही नमाज अदा केली किंवा नाही. याचे काय कारण आहे? हेच की आपण लपूनसुद्धा अल्लाहच्या आज्ञेचे उल्लंघन करण्यास भिता आणि आपल्याला विश्वास आहे की अल्लाहपासून कोणताही अपराध लपविणे शक्य नाही. यावरून आपण कल्पना करू शकता की अशाप्रकारे नमाज अल्लाहचे भय व तो हजर असणारा व दृष्टी ठेवणारा, सर्वज्ञ व खबर राखणारा असल्याबद्दल माणसाच्या मनात दृढ विश्वास निर्माण करते व त्याची वारंवार उजळणी करते. दिवस-रात्र चोवीस तासांत तुम्ही नेहमी अल्लाहची उपासना व गुलामी कशी करू शकता की जोपर्यंत हे भय व हा विश्वास तुमच्या हृदयात विद्यमान नसेल? जर ही गोष्ट तुमच्या हृदयात नसेल तर हे कसे संभव आहे की रात्रंदिवस आपणास हे हजारो व्यवहार जगात करावे लागतात त्यात तुम्ही अल्लाहचे भय बाळगून सदाचारावर टिकून राहाल व दुराचारापासून दूर राहाल?

अल्लाहच्या कायद्याचे ज्ञान

चौथी गोष्ट जी अल्लाहच्या उपासनेसाठी अत्यंत आवश्यक आहे ती अशी की तुम्हाला अल्लाहच्या कायद्याचे ज्ञान असावे. ते अशासाठी की जर तुम्हाला कायद्याचे ज्ञानच नसेल तर त्याचे पालन कसे करू शकाल? हे कार्यदेखील नमाजच करते. नमाजमध्ये जे पवित्र कुरआनचे पठण केले जाते ते अशासाठीच आहे की दररोज अल्लाहच्या आदेशांचे व त्याच्या कायद्याचे ज्ञान होत राहावे. शुक्रवारचे प्रवचन (खुतबा) सुद्धा यासाठीच आहे की आपल्याला इस्लामच्या शिकवणीचा परिचय व्हावा. जमाअतसह नमाज व शुक्रवारपासून एक लाभ असादेखील होतो की 'आलिम' (धर्मपंडित) व सामान्य लोक वारंवार एकत्र गोळा होतात व लोकांना नेहमी अल्लाहच्या आदेशांशी परिचित होण्याची संधी प्राप्त होते. आता हे दुर्दैव होय की नमाजमध्ये जे काही पठण केले जाते त्याच्याशी परिचित होण्याचा आम्ही प्रयत्न करीत नाही. शुक्रवारची प्रवचने (खुतबात) सुद्धा अशी ऐकविली जातात की ज्यापासून इस्लामविषयी कसलेही ज्ञान प्राप्त होत नाही. तसेच नमाजसाठी जमअत (समूह) मध्ये सामील होऊनदेखील धर्मपंडित (आलिम) अज्ञानी बंधुंना काहीही शिकवत नाहीत आणि अज्ञानी मंडळीसुद्धा आपल्या बंधुंना काही विचारीत नाहीत. नमाज तर आपणास त्या सर्व लाभांची संधी देते, परंतु जर एखादा स्वत:च काहीही त्याचा फायदा उचलत नसेल तर त्यात नमाजचा दोष तो कोणता?

सामूहिकतेचा सराव

पाचवी गोष्ट अशी की प्रत्येक मुस्लिमाने जीवनाच्या या धकाधकीत एकटे असू नये, तर सर्व मुस्लिमांनी मिळून एक जमाअत (समूह) बनवावी आणि अल्लाहची उपासना म्हणजे त्याच्या आदेशांचे पालन करण्यासाठी, त्याच्या कायद्यानुसार चालण्यासाठी व त्याच्या कायद्याचा जगात प्रसार करण्यासाठी, तो जारी करण्यासाठी एकमेकाला सहकार्य करावे. आपणास कल्पना आहे की या जीवनात एकीकडे मुस्लिम म्हणजे अल्लाहचे आज्ञाधारक दास आहेत आणि दुसरीकडे 'काफिर' म्हणजे अल्लाहशी इन्कार करणारे दास आहेत. रात्रंदिवस आज्ञाधारकता व इन्काराच्या दरम्यान संघर्ष माजलेला आहे. नाकारणारे अल्लाहच्या कायद्याचा भंग करीत आहेत आणि त्याउलट शैतानी कायद्यांचे प्रचलन करीत आहेत. त्यांच्याशी सामना करण्यासाठी जर एक एक मुस्लिम एकटा असेल तर यशस्वी होऊ शकणार नाही. आवश्यकता या गोष्टीची आहे की अल्लाहच्या आज्ञाधारक दासांनी मिळून सामूहिक शक्तीने या बंडाला-विद्रोहाला तोंड दिले पाहिजे आणि अल्लाहचा कायदा त्यांनी जारी करावा. ही सामूहिक शक्ती निर्माण करणारी सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे नमाज आहे. पाच वेळेच्या नमाजची जमाअत, शिवाय शुक्रवारच्या नमाजमधील मोठा समुदाय व दोन्ही ईदच्या वेळेचा समूह, हे सर्व मिळून मुस्लिमांना एक मजबूत भिंतीप्रमाणे बनवितात आणि त्यांच्यात ते ऐक्य व व्यावहारिक एकता उत्पन्न करतात जी दररोजच्या व्यावहारिक जीवनात मुस्लिमांना एकमेकांचे साहाय्यक बनण्यासाठी आवश्यक आहे.

नमाजमध्ये काय पठण केले जाते?

माझ्या बंधुनो! गत प्रवचनात मी सांगितले आहे की कशाप्रकारे नमाज माणसाला अल्लाहची उपासना म्हणजे गुलामी व आज्ञापालनासाठी तयार करते. यासंबंधी मी जे काही सांगितले होते त्यावरून आपणास कळले असेल की जो मनुष्य केवळ कर्तव्य व अल्लाहची आज्ञा समजून नियमितपणे नमाज अदा करीत असेल तो जरी नमाजमधील प्रार्थनांचा अर्थ समजत नसला तरी त्याच्यात अल्लाहचे भय व तो हजर व दृष्टी ठेवणारा असल्याबद्दलचा त्याचा विश्वास व त्याच्या न्यायालयात एके दिवशी हजर राहावयाचे आहे अशी श्रद्धा नमाजमुळे नेहमी ताजी होत राहते. त्याच्या मनात ही श्रद्धा सदैव जिवंत राहते की तो अल्लाहशिवाय इतर कोणाचा दास नाही आणि अल्लाहच त्याचा खरा बादशाह व शासक आहे. त्याच्यात कर्तव्यपरायणतेची सवय व अल्लाहच्या आज्ञांची अंमलबजावणी करण्याची तत्परता उत्पन्न होते. त्याच्यात ते गुण आपोआप निर्माण होऊ लागतात जे माणसाच्या संपूर्ण जीवनाला अल्लाहची गुलामी व उपासना बनविण्यासाठी आवश्क आहेत.

आता आपणास मी असे सांगू इच्छितो की जर माणसाने हीच नमाज समजून अदा केली आणि अदा करताना हेही जाणत राहिला की तो काय म्हणत आहे तर त्याचे विचार, त्याच्या सवयी व वृत्तीवर किती मोठा परिणाम होईल? त्याच्या ईमानची शक्ती किती वाढेल? आणि त्याच्या जीवनाचा रंग कसा पालटेल?

अजान व त्याचे परिणाम

सर्वप्रथम अजानचा विचार करू या. दिवसातून पाच वेळा आपणास असे म्हणून हाक दिली जाते-

“अल्लाहु अकबर, अल्लाहु अकबर”

अर्थात- अल्लाह महान आहे, अल्लाह महान आहे.

“अशहदु अल्लाऽ इलाहा इल्लल्लाहु”

अर्थात- मी ग्वाही देतो की अल्लाहशिवाय अन्य कोणीही ईश्वर नाही.

“अशहदु अन्न मुहम्मदर्रसूलुल्लाह”

अर्थात- मी ग्वाही देतो की मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आहेत.

"हय्या अलस्सलाह"

अर्थात- या नमाजसाठी.

"हय्या अललफलाह"

अर्थात- या त्या कामासाठी ज्यात कल्याण आहे.

"ला इलाहा इल्लल्लाह"

अर्थात- अल्लाहशिवाय अन्य कोणीही ईश्वर नाही.

पाहा, ही किती महान घोषणा आहे! दररोज पाच वेळा हा आवाज कशाप्रकारे तुम्हाला स्मरण करून देतो की, "पृथ्वीवर जितके मोठे ईशत्वाचे दावेदार दृष्टीला पडतात ते सर्व खोटे आहेत? पृथ्वी व आकाशात एकच व्यक्तित्व आहे ज्याचा मोठेपणा योग्य आहे आणि तोच उपासनेला योग्य आहे. या, त्याची उपासना करा. त्याच्याच उपासनेत तुमचे इहलोकातील व परलोकातील कल्याण आहे. कोण आहे जो हा आवाज ऐकून बसून राहील? ज्याच्या हृदयात ईमान आहे तो इतकी महान ग्वाही आणि अशी जबरदस्त हाक ऐकून आपल्या जागी बसून राहील आणि आपल्या स्वामीसमोर नतमस्तक होण्यास धाव घेणार नाही, असे कसे शक्य आहे?

वुजू

अजानचा आवाज ऐकून तुम्ही उठता आणि सर्वप्रथम स्वत:ची तपासणी करून पाहता की मी शुचिर्भूत आहे किंवा नाही? माझा वुजू (तोंड, हात, पाय धुणे) आहे किंवा नाही? जणू तुम्हाला या गोष्टीची कल्पना आहे की दोन्ही जगाच्या (इहलोक व परलोकाच्या) बादशाहच्या दरबारात हजेरी देण्याची बाब जगातील दुसऱ्या सर्व बाबींपेक्षा निराळी आहे. दुसरी कार्ये तर कोणत्याही परिस्थितीत केली जाऊ शकतात, परंतु येथे शरीर व कपड्यांची स्वच्छता आणि त्यापेक्षाही जास्त म्हणजे 'तहारत' (वुजू) शिवाय हजेरी देणे सक्त निरादर करणे होय. ही भावना मनाशी बाळगून तुम्ही प्रथम स्वत: शुचिर्भूत (स्वच्छ) असल्याबद्दल खात्री करून घेता आणि नंतर वुजू करण्यास सुरूवात करता. या वुजूच्या दरम्यान जर तुम्ही आपले अवयव धुता-धुता अल्लाहचा जप करीत राहाल आणि त्यातून मोकळे झाल्यावर ती प्रार्थना (दुआ) म्हणाल जी

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शिकविली आहे; तर केवळ तुमचे अवयवच धुतले जातील असे नव्हे तर त्याबरोबरच तुमचे हृदयदेखील धुवून निघेल. त्या प्रार्थनेचे शब्द असे आहेत-

"अशहदु अल्लाह इलाहा इल्लल्लाहु व अशहदु अन्ना मुहम्मदन अब्दुहू व रसूलुहू. अल्लाहुम्म अजअलनी मिनत्तवाबीना वजअलनी मिनल मुत्तताहिरीन."

अर्थात- मी ग्वाही देतो की एकमेव अल्लाहशिवाय कोणीही ईश्वर नाही आणि मी साक्ष देतो की आदरणीय मुहम्मद (स.) हे अल्लाहचे दास आणि पैगंबर आहेत. हे अल्लाह मला पश्चात्ताप करणाऱ्या लोकांत सामील कर आणि मला शुचिर्भूतता अवलंबणारा बनव.

निय्यत (हेतू)

यानंतर तुम्ही नमाजसाठी उभे राहता. तुमचे तोंड किबल्याच्या (मक्का शहरातील मस्जिद - जिच्याकडे तोंड करून नमाज अदा करतात) समोर आहे. स्वच्छ व शुचिर्भूत होऊन जगाच्या बादशाहच्या दरबारात तुम्ही हजर आहात. सर्वप्रथम तुमच्या तोंडातून हे शब्द निघतात-

"अल्लाहु अकबर"

अर्थात- अल्लाह महान आहे.

या जबरदस्त सत्याचा स्वीकार करीत तुम्ही कानापर्यंत हात उचलता, जणू तुम्ही जगाचा व त्यात जे काही आहे त्याचा त्याग करीत आहात. मग हात बांधता, जणू तुम्ही आपल्या बादशाहसमोर संपूर्ण आदराने हात बांधून उभे आहात. यानंतर तुम्ही काय विनवणी करता?

तसबीह

"सुबहानकल्लाहुम्मा व बिहमदिका व तबारकस्मुका व तआला जद्दुका वला इलाहा गैरुका"

अर्थात- हे अल्लाह! तुझ्या पावित्र्याचे वर्णन करतो आणि तेही तुझी प्रशंसा करीत. अत्यंत समृद्धशाली आहे तुझे नाव. सर्वांत उच्च व श्रेष्ठ आहे तुझी महानता आणि तुझ्याशिवाय कोणीही ईश्वर नाही.

तअव्वुज़

"अवूजु बिल्लाहि मिनश्शैतानिर्रजीम"

अर्थात- मी अल्लाहचा आश्रय मागतो धिक्कारलेल्या शैतानाच्या हस्तक्षेप व खोड्यापासून.

बिस्मिल्लाह

"बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम"

अर्थात- आरंभ करतो मी अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे.

हम्द

"अलहम्दुलिल्लाहि रब्बिलआलमीन"

अर्थात- सर्व प्रशंसा अल्लाहसाठी आहे जो सर्व जगवासियांचा पालनकर्ता आहे.

"अर्रहमानिर्रहीम"

अर्थात- असीम दयावंत व परम कृपावंत आहे.

"मालिकि यौमिद्दीन"

अर्थात- न्यायाच्या दिवसाचा स्वामी आहे. (ज्या दिवशी कर्मांचा निर्णय केला जाईल आणि प्रत्येकाला त्याच्या कर्मांचे फळ मिळेल.)

"इय्यक नअबुदु व इय्याक नस्तईन"

अर्थात- हे स्वामी आम्ही तुझीच उपासना करतो आणि तुझ्याकडूनच मदत मागतो.

"इहदिनस्सिरातल मुस्तकीम"

अर्थात- आम्हाला सरळमार्ग दाखव.

"सिरातल्लज़ीना अनअमता अलैहिम"

अर्थात- अशा लोकांचा मार्ग ज्यांच्यावर तू कृपा केलीस आणि ज्यांना तू इनाम दिले.

"ग़ैरिल मग़ज़ूबि अलैहिम वलज्ज्वाल्लीन"

अर्थात- ज्यांच्यावर तुझा प्रकोप उतरला नाही आणि जे मार्गभ्रष्ट लोक नाहीत.

"आऽमीन"

अर्थात- हे अल्लाह! असेच घडो. हे स्वामी! तू आमची ही प्रार्थना कबूल कर.

(दिव्य कुरआन, सूरह फातिहा)

यानंतर पवित्र कुरआनमधील काही आयतींचे पठण करता, ज्यांच्यापैकी प्रत्येकात अमृत भरलेले आहे, उपदेश आहे, शिकवण आहे, धडा आहे आणि त्याच सरळमार्गाचे मार्गदर्शन आहे ज्याच्यासाठी तुम्ही 'सूरह फातिहा'मध्ये प्रार्थना केली आहे. उदाहरणार्थ- पवित्र कुरआनमधील विभिन्न सूरती :

वलअस्र

"वल अस्रि. इन्नलइन्साना लफ़ी खुस्र."

अर्थात- काळाची शपथ! मनुष्य तोट्यात आहे.

"इल्लल्लज़ीना आमनू व अमिलुस्स्वालिहाति"

अर्थात- परंतु तोट्यापासून वाचलेले केवळ तेच लोक आहेत ज्यांनी ईमान आणले आणि ज्यांनी सत्कर्मे केली.

"वतवासौ बिलहक्कि व तवा सौबिस्सब्र."

अर्थात- आणि ज्यांनी एकमेकाला सत्यावर चालण्याचे मार्गदर्शन केले आणि जे सत्यावर दृढ राहण्याबद्दल सांगत राहिले.

(दिव्य कुरआन, सूरह अस्र)

यावरून असा धडा मिळतो की विनाश व निराशेपासून मनुष्य केवळ अशा प्रकारेच वाचू शकतो की त्याने ईमान आणावे आणि सत्कर्मे करावीत आणि केवळ इतकेच पुरेसे नाही तर ईमानधारकांची एक अशी जमाअत असली पाहिजे की जी धर्मावर दृढ असेल व दृढ राहण्यात एकमेकाला साहाय्य करीत राहील.

दुसरे उदाहरणार्थ-

अलमाऊन

“अरऐतल्लज़ी युकाज़्ज़िबु बिद्दीन.”

अर्थात- तू पाहिलेस की जो मनुष्य निवाड्याच्या दिवसाला मानीत नाही तो कसला मनुष्य असतो.

“फ़ज़ालिकल्लज़ी यदुअउलयतीम.”

अर्थात- असलाच मनुष्य अनाथांना धुडकावून देतो.

“वला यहुज़्ज़ु अला तआमिलमिसकीन.”

अर्थात- आणि गरिबांना स्वत: जेवू घालणे तर सोडाच दुसऱ्यांनादेखील असे सांगणे पसंत करीत नाही की गरिबांना जेवण द्या.

“फवैलुल्लिल मुसल्लीनल्लज़ीना हुम अन सलातिहिम साहून अल्लजीना हुम युराऊन व यमनऊनल माऊन.”

अर्थात- विनाश आहे त्या नमाज अदा करणाऱ्यांसाठी जे (अंतिम दिवसावर विश्वास ठेवीत नाहीत. म्हणून) नमाजकडे दुर्लक्ष करतात आणि जरी नमाज अदा करीत असतील तरी केवळ दाखविण्यासाठी. आणि त्यांची मते अशी संकुचित आहेत की लहान लहान वस्तूसुद्धा गरजूंना देतात त्यांचे मन दुखते.

(दिव्य कुरआन, सूरह माऊन)

यावरून असा धडा मिळतो की परलोकावरील विश्वास इस्लामचा प्राण आहे. त्याच्याशिवाय मनुष्य त्या मार्गावर कदापि चालूच शकत नाही जो अल्लाहचा सरळमार्ग आहे.

तिसरे उदाहरण-

हुमजह

"वैलुल्लिकुल्लि हुमजतिल्लुमजह."

अर्थात- वाईट वाटते त्या माणसाचे जो लोकांचे दोष शोधतो आणि आवाज बदलून लोकांना चिढवितो.

"निल्लज़ी जमआ मालंव्व अद्ददह."

अर्थात- रुपये गोळा करतो आणि मोजून मोजून ठेवतो.

"यहसबु अन्न मालहू अख़लदह."

अर्थात- आपल्या मनात असे समजतो की त्याची संपत्ती कायम टिकून राहील.

"कल्ला लयुमबज़न्ना फ़िलहुतॉमह."

अर्थात- कदापि नाही. तो एके दिवशी अवश्य (मरेल आणि) 'हुतमह'मध्ये (अल्लाहने प्रज्वलित केलेल्या अग्नीमध्ये) टाकला जाईल.

"वमाऽ अदराका मलहुतॉमह"

अर्थात- आणि तुम्हाला माहीत आहे की 'हुतमह' काय आहे?

"नारुल्लाहिलमूकदतुल्लती तत्तलिउ अललअफइदह."

अर्थात- अल्लाहने भडकविलेला अग्नी ज्याच्या ज्वाला मनावर आच्छादित होतात.

"इन्नहा अलैहिम मुअसदतुन. फी अमदिम मुमद्ददह."

अर्थात- तो (अग्नी) उंचउंच खांबासारख्या ज्वालांच्या रूपात त्यांना घेरून टाकील.

(दिव्य कुरआन, सूरह हुमजह)

सारांश असा की तुम्ही पवित्र कुरआनमधील जितके सूरह किंवा आयतींचे नमाजमध्ये पठण करता त्या कोणत्या न कोणत्या उच्च दर्जाचा उपदेश अथवा मार्गदशन करतात आणि तुम्हाला सांगतात की अल्लाहचे आदेश काय आहेत की ज्यानुसार तुम्हाला जगात कर्मे केली पाहिजेत.

रुकूअ

या आदेशांचे पठण केल्यानंतर तुम्ही "अल्लाहु अकबर" म्हणत 'रुकूअ' (गुडघ्यांवर हात ठेवून वाकून राहणे) करता. गुडघ्यांवर हात ठेवून आपल्या स्वामीसमोर वाकता आणि वारंवार म्हणता-

"सुबहाना रब्बियल अज़ीम."

अर्थात- पवित्र आहे माझा पालनकर्ता जो फार महान आहे.

मग सरळ उभे राहता आणि म्हणता-

"समिअल्लाहु लिमन हमिदह."

अर्थात- अल्लाहने ऐकून घेतले त्या माणसाचे ज्याने त्याची स्तुती केली.

सजदह

मग "अल्लाहु अकबर" म्हणत 'सजदह' (साष्टांग नमस्कार) मध्ये मस्तक जमिनीवर टेकता व वारंवार म्हणता-

"सुबहाना रब्बियल अअला."

अर्थात- पवित्र आहे माझा पालनकर्ता जो सर्वांत उच्च व श्रेष्ठ आहे.

अत्तहिय्यात

मग "अल्लाहु अकबर" म्हणत डोके वर उचलता आणि अत्यंत अदबीने बसून याचे पठण करता-

"अत्तहियातु लिल्लाहि वस्सलवातु वत्तयिबातु अस्सलामु अलैका अय्युहन्नबिय्यु व रहमतुल्लाहि व बरकातुहू. अस्सलामु अलैना व अला इबादिल्ला हिस्सालिहीन, अशहदु अल्ला इलाहा इल्लल्लाहु व अशहदु अन्ना मुहम्मदन अब्दुहू व रसूलुहू."

अर्थात- आमची सलामी, आमच्या नमाजी आणि सर्व पवित्र गोष्टी अल्लाहसाठी आहेत. हे पैगंबर मुहम्मद (स.)! आपल्यावर सलाम आणि अल्लाहची कृपा व भरभराट असो. आमच्यावर व अल्लाहच्या सर्व सदाचारी गुलामांवर सुरक्षा

असो. मी ग्वाही देतो की अल्लाहशिवाय अन्य कोणीही उपास्य नाही आणि मी ग्वाही देतो की आदरणीय मुहम्मद (स.) अल्लाहचे दास आणि पैगंबर आहेत.

ही ग्वाही देताना तुम्ही आंगठ्याजवळील बोट (तर्जनी) उचलता कारण ही नमाजवरील तुमच्या श्रद्धेची घोषणा आहे आणि जिभेने ती उच्चारताना विशेषकरून लक्ष व भर देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर तुम्ही 'दरूद' (अल्लाहजवळ पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर कृपा करण्याविषयी प्रार्थनेचे) पठण करता.

दरूद

"अल्लाहुम्मा सल्लि अला सय्यिदिना व मौलाना मुहम्मदिन व अलाऽ आलि मुहम्मदिन कमा सल्लैता अलाऽ इब्राहीमा व अलाऽ आलि इब्राहीमा इन्नका हमीदुममजीद. अल्लाहुम्मा बारिक अला सय्यिदिना व मौलाना मुहम्मदिन व अलाऽ आलि मुहम्मदिन कमा बारकता अलाऽ इब्राहीमा व अलाऽ आलि इब्राहीमा इन्नका हमीदुममजीद."

अर्थात- हे अल्लाह! कृपा कर आमचे सरदार व मौला मुहम्मद (स.) आणि त्यांच्या वंशजांवर ज्याप्रमाणे तू कृपा केलीस इब्राहीम (अ.) आणि त्यांच्या वंशजांवर. नि:संशय तू उत्तम गुणवान व श्रेष्ठ आहेस. आणि हे अल्लाह! समृद्धी उतरव आमचे सरदार व मौला मुहम्मद (स.) आणि त्यांच्या वंशजांवर ज्याप्रमाणे तू समृद्धी उतरविली इब्राहीम (अ.) व इब्राहीम (अ.) यांच्या वंशजांवर. निश्चितपणे तू उत्तम गुणवान व श्रेष्ठ आहेस.

या 'दरूद'चे पठण केल्यानंतर तुम्ही अल्लाहजवळ पुढीलप्रमाणे प्रार्थना (दुआ) करता-

दुआ

"अल्लाहुम्मा इन्नीऽ अऊजुबिका मिन अज़ाबि जहन्नमा व अऊजुबिका मिन अज़ाबिल कब्रि व अऊजु बिका मिन फितनतिल मसीहिद्दज्जालि व अऊजु बिका मिन फितनतिल महया व फितनतल ममाति व अऊजु बिका मिनल मअसिमि वलमग़रिम."

अर्थात- हे अल्लाह! मी नरकाच्या प्रकोपापासून तुझा आश्रय मागतो व कबरीच्या (थडग्याच्या) प्रकोपापासून आणि त्या मार्गभ्रष्ट करणाऱ्या दज्जालच्या उपद्रवापासून जो पृथ्वीवर आच्छादित होणार आहे त्यापासून तुझा आश्रय मागतो. हे अल्लाह! मी जीवन व मृत्यूच्या उपद्रवापासून व दुष्कर्मांच्या जबाबदारी व कर्जबाजारीपणापासून तुझा आश्रय मागतो.

सलाम

या प्रार्थनेचे (दुआचे) पठण केल्यानंतर तुमची नमाज पूर्ण होते. आता तुम्ही स्वामीच्या दरबारातून परत फिरता आणि परतल्यावर पहिले कृत्य कोणते करता? असे की उजव्या व डाव्या बाजूला तोंड फिरवून सर्व उपस्थितांना व जगाच्या प्रत्येक वस्तूसाठी सुरक्षितता व कृपेची प्रार्थना करता-

"अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाह"

जणू ही शुभवार्ता आहे जी अल्लाहच्या दरबारातून परतताना तुम्ही जगासाठी आणली आहे.

ही आहे ती नमाज जी तुम्ही सकाळी उठल्यावर जगाचे कामकाज सुरू करण्यापूर्वी अदा करता. मग काही तास कामकाजात गर्क राहून दुपारी अल्लाहच्या दरबारात उपस्थित होऊन हीच नमाज अदा करता. त्यानंतर काही तास गेल्यावर तिसऱ्या प्रहरी हीच नमाज अदा करता. मग काही तास गुंतलेले राहून संध्याकाळी याच नमाजची पुनरावृत्ती करता. त्यानंतर जगाच्या कामातून मुक्त झाल्यावर झोपण्यापूर्वी शेवटी आपल्या स्वामीसमोर तुम्ही हजर होता. या शेवटच्या नमाजचा अंत 'वितर'च्या नमाजने होतो. या 'वितर'च्या नमाजच्या तिसऱ्या 'रकअत'मध्ये तुम्ही एक वैभवशाली प्रतिज्ञापत्र आपल्या स्वामीपुढे सादर करता. ही 'दुआ-ए-कुनूत' आहे. 'कुनूत'चा अर्थ आहे- अल्लाहसमोर अपमान व विनम्रता, आज्ञाधारकता व गुलामीची स्वीकृती व प्रतिज्ञा. ही प्रतिज्ञा तुम्ही कोणत्या शब्दांत करता ते लक्षपूर्वक ऐका-

दुआ-ए-कुनूत

"अल्लाहुम्मा इन्ना नस्तईनुका व नस्तग़फ़िरुका व नुअमिनु बिका व नतवक्कलु अलैका व नुस्नी अलैकलख़ैरा नश्कुरुका वला नक़्फ़ुरुका व नख़लउ व

नतरुकु मय्यफ़जुरुका अल्लाहुम्मा इय्याका नअबुदु व लका नुसल्ली व नसजुदु व इलैका नसआ व नहफिदु नर्जू रहमतका व नख्शाअज़ाबका इन्ना अज़ाबका बिलकुफ्फारि मुलहिक़."

अर्थात- हे अल्लाह! आम्ही तुझ्याकडून साहाय्य मागतो, तुझ्याकडून मार्गदर्शनाची याचना करतो, तुझ्याकडे पापांची क्षमायाचना करतो. तुझ्यावर ईमान आणतो. तुझ्यावरच भरवसा ठेवतो. सर्व प्रशंसा तुझ्यासाठीच विशिष्ट करतो. आम्ही तुझ्याकडे कृतज्ञता व्यक्त करतो, कृतघ्नपणा करीत नाही. आम्ही त्या प्रत्येक माणसाला सोडून देऊ आणि त्याच्याशी संबंधविच्छेद करू जो तुझा आज्ञाधारक नसेल. हे अल्लाह! आम्ही तुझीच गुलामी करतो आणि तुझ्यासाठीच नमाज अदा करतो व सजदा (साष्टांग नमस्कार) करतो आणि आमचे सर्व परिश्रम व धावपळ तुझ्याच प्रसन्नतेसाठी आहे. आम्ही तुझ्या कृपेची आकांक्षा करतो आणि तुझ्या प्रकोपाचे भय बाळगतो. निश्चितपणे तुझा भयंकर प्रकोप अशा लोकांवर होईल जे काफिर (नास्तिक, अनेकेश्वरवादी) आहेत.

नमाज व चारित्र्यगठन

बंधुनो! विचार करा जो मनुष्य दिवसातून पाच वेळा अजानचा ध्वनी ऐकत असेल आणि समजत असेल की एखाद्या महान गोष्टीची ग्वाही दिली जात आहे व कशा जबरदस्त बादशाहच्या सेवेत बोलविले जात आहे. जो मनुष्य प्रत्येक वेळी ही हाक ऐकून आपले सर्व कामकाज सोडील आणि त्या पवित्र व्यक्तित्वाकडे धाव घेईल ज्याला तो आपला आणि संपूर्ण सृष्टीचा स्वामी मानतो आणि जो मनुष्य प्रत्येक नमाजपूर्वी आपले शरीर व हृदयाला वुजूने शुचिर्भूत करील, आणि जो मनुष्य कित्येक वेळा नमाजमध्ये त्या सर्व गोष्टी समजून उमजून अदा करील, ज्या मी आता आपल्यासमोर सांगितल्या आहेत, तर हे कसे शक्य आहे की त्याच्या मनात अल्लाहचे भय उत्पन्न होणार नाही? त्याला अल्लाहच्या आदेशांचे उल्लंघन करताना लज्जा वाटणार नाही का? त्याचा आत्मा पाप व दुराचाराचे काळेकुट्ट डाग घेऊन वारंवार अल्लाहसमोर जाताना कंपित होणार नाही का? हे कसे शक्य आहे की मनुष्य नमाजमध्ये अल्लाहच्या गुलामीचा स्वीकार करून त्याच्या आज्ञापालनाची प्रतिज्ञा करून त्याला निर्णयाच्या दिवसाचा स्वामी मान्य करून जेव्हा आपल्या कामकाजाकडे परत येईल तेव्हा तो खोटे बोलेल? बेईमानी करील? लोकांचे हक्क बळकावील? लाच

खाईल व देईल? व्याज घेईल व देईल? काय अल्लाहच्या दासांना इजा पोहचवील? व्यभिचार, निर्लज्जपणा व दुराचार करील? आणि मग त्या सर्व कर्मांचे ओझे वाहून पुन्हा अल्लाहसमोर हजर होण्याचे आणि त्याच सर्व गोष्टींची प्रतिज्ञा करण्याचे धाडस करू शकेल काय? होय, हे कसे शक्य आहे की तुम्ही जाणूनबुजून अल्लाहसमोर छत्तीस वेळा प्रतिज्ञा करावी की "आम्ही तुझीच गुलामी करतो आणि तुझ्याकडूनच मदत मागतो" आणि मग अल्लाहशिवाय दुसऱ्यांची गुलामी करावी व दुसऱ्यासमोर मदतीसाठी हात पसरावे? जर एकदा तुम्ही प्रतिज्ञा करून त्याविरूद्ध वर्तन कराल तर दुसऱ्यांदा अल्लाहच्या दरबारात हजर होताना तुमचा अंतरात्मा तुम्हाला धिक्कारीत राहील आणि तुम्हाला लाज वाटेल. दुसऱ्यांदा उल्लंघन कराल तर अधिक लज्जा वाटेल. मग आतून अधिकच धिक्कार करील. संपूर्ण आयुष्यभर हे कसे शक्य आहे की दररोज पाच पाच वेळा नमाज अदा करावी आणि तरीसुद्धा तुमच्या कर्मांत सुधारणा घडून येऊ नये? तुमच्या चारित्र्यात सुधारणा होऊ नये? आणि तुमच्या जीवनाचा कायापालट होऊ नये? म्हणूनच अल्लाहचे नमाजचे हे वैशिष्ट्य सांगितले आहे की-

"इन्नस्सलाता तनहा अनिलफहशाऽइ वलमुनकर."

अर्थात- निश्चितपणे नमाज माणसाला निर्लज्जपणा व दुराचारापासून रोखते.

परंतु जर एखादा असा निघाला की इतक्या जबरदस्त सुधारणा घडवून आणणाऱ्या गोष्टीनेसुद्धा त्याच्यात सुधारणा दिसून येत नाही तर हा त्याच्या अपप्रवृत्तीचा दोष आहे, नमाजचा नव्हे. पाणी व साबणाचा दोष नव्हे तर याला कारण कोळशाचा स्वत:चा काळेपणा होय.

बंधुनो! आपल्या नमाजमध्ये एक मोठी उणीव आहे आणि ती अशी की आपण जे काही पठण करता त्याचा अर्थ आपल्याला कळत नाही. जर आपण थोडीशी सवड काढली तर त्या सर्व दुआंचा (प्रार्थनांचा) अर्थ उर्दूमध्ये अथवा आपल्या मातृभाषेत पाठ करू शकता. याने असा लाभ होईल की जे काही आपण पठण कराल त्याचे आपण आकलनसुद्धा करू शकाल.

जमाअतसह नमाज

बंधुनो! मागील प्रवचनात तर मी आपणास नमाजपासून होणाऱ्या लाभाविषयी सांगितले होते, ज्यावरून आपल्याला कल्पना आली असेल की ही उपासना स्वत:च एक महान उपासना आहे, ती माणसात गुलामीचे कौशल्य निर्माण करते आणि त्याला गुलामीचा हक्क देण्यास पात्र बनविते. आता मी आपल्याला जमाअतसह नमाज अदा केल्याने होणाऱ्या लाभाविषयी सांगू इच्छितो ज्यावरून आपल्याला कल्पना येईल की महान अल्लाहने आपल्या कृपा व उपकाराने कशाप्रकारे एकाच गोष्टीत आमच्यासाठी सर्व देणग्या एकत्रित केल्या आहेत. प्रथम तर स्वत: नमाजच कुठे कमी होती की ती जमाअतसह अदा करण्याची आज्ञा देऊन तिला अधिक दैदिप्यमान केले आणि तिच्यात त्या शक्तीचा संचार केला की जी मानवाचा कायापालट करण्याचे अनुपम सामर्थ्य बाळगते?

नमाज कोणते गुण निर्माण करते?

यापूर्वी मी आपणास सांगितले आहे की जीवनात नेहमी स्वत:ला अल्लाहचा दास मानणे, एका आज्ञाधारक दासाप्रमाणे मालकाच्या आज्ञेच्या अधीन राहणे आणि मालकाच्या आज्ञेची अंमलबजावणी करण्यास सदैव तत्पर राहणे ही खरी उपासना हो आणि नमाज याच उपासनेसाठी मनुष्याला तयार करते. हेदेखील मी आपणास सांगितले आहे की या उपासनेसाठी माणसात ज्या गुणांची आवश्यकता आहे ते सर्व गुण नमाज निर्माण करते. गुलामीची अनुभूती, अल्लाह व त्याच्या पैगंबर व त्याच्या ग्रंथावर ईमान, परलोकावर विश्वास, अल्लाहचे भय, अल्लाहला अगम्याचे ज्ञान बाळगणारा मानणे आणि त्याला सदैव आपल्या जवळ समजणे, अल्लाहच्या आज्ञापालनासाठी सदैव तत्पर राहणे, अल्लाहच्या आज्ञांशी परिचित असणे, हे आणि असले सर्व गुण नमाज मानवात निर्माण करते. हे गुण माानवाला अल्लाहचा खऱ्या अर्थाने दास बनण्यासाठी आवश्यक आहेत.

संपूर्ण गुलामी एकट्याने शक्य नाही

परंतु लक्षपूर्वक पाहिले तर आपल्याला कळेल की मनुष्य जरी स्वत: कितीही परिपूर्ण असला तरी तो अल्लाहच्या गुलामीचा पूर्ण हक्क तोपर्यंत अदा करू शकत

नाही जोपर्यंत दुसरे गुलामदेखील त्याला साहाय्यक सिद्ध होत नाहीत. तो अल्लाहचे सर्व आदेश तोपर्यंत अंमलात आणू शकत नाही जोपर्यंत ते अनेक लोक, ज्यांच्या समवेत तो रात्रंदिवस राहतो, ज्यांच्याशी तो नेहमी व्यवहार करतो, या आज्ञापालनात त्याला सहकार्य करीत नाहीत. जगात मनुष्य एकटाच जन्मलेला नाही. तो एकटा राहून कोणतेही काम करू शकत नाही. त्याचे संपूर्ण जीवन आपले भाऊबंद, मित्र आणि शेजारी, व्यवहार करणारे व जीवनातील असंख्य मित्रांशी हजारो प्रकारच्या संबंधाने त्याला जखडलेले आहे. अल्लाहच्या आज्ञासुद्धा एकट्या दुकट्या माणसासाठी नाहीत, तर याच संबंधांना सुरळीत करण्यासाठी आहेत. आता जर या सर्व लोकांनी अल्लाहच्या आज्ञांचे पालन करण्यात एकमेकाला सहकार्य केले तर सर्वजण आज्ञाधारक गुलाम बनू शकतात. जर सर्वचजण अवज्ञा करण्यास कटिबद्ध झाले अथवा त्यांचे संबंध अशाप्रकारे झाले की ते अल्लाहच्या आज्ञा पाळण्यात एकमेकाला साहाय्यभूत होणार नसतील, तर एकट्या माणसासाठी हे अशक्य आहे की त्याने आपल्या जीवनात अल्लाहच्या कायद्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी करू शकावे.

एकट्याने शैतानला तोंड देणे शक्य नाही

त्याचबरोबर पवित्र कुरआनचे काळजीपूर्वक पठण केले तर आपल्याला कळेल की अल्लाहची आज्ञा केवळ अशी नाही की स्वत: अल्लाहचे अदीन व आज्ञाधारक दास बनावे तर त्याचबरोबर ही आज्ञासुद्धा आहे की जगाला अल्लाहच्या अदीन व आज्ञाधारक बनवावे. जगात अल्लाहच्या कायद्याचा प्रसार करावा व तो जारी ठेवावा. जेथे जेथे शैतानाचा कायदा प्रचलित आहे, तेथे तो संपुष्टात आणावा व त्याऐवजी एकमेव अल्लाहच्या कायद्याच्या राज्याची स्थापना करण्यात यावी. ही महान सेवा जी अल्लाहने आपल्या सुपूर्द केली आहे ती एकटा मुस्लिम फलद्रुप करू शकणार नाही. कोट्यवधी मुस्लिम असले तर वेगवेगळे राहून त्यांनी प्रयत्न केले तरीसुद्धा ते शैतानाच्या गुलामांच्या शिस्तबद्ध शक्तीला खाली पाहावयास लावू शकत नाहीत. यासाठीदेखील आवश्यक आहे की मुस्लिमांनी एकसंघ बनावे. एकमेकांचे साहाय्यक बनावे, एक दुसऱ्याचे पाठीराखे बनावे आणि सर्वांनी मिळून एकाच उद्देशासाठी प्रयत्नशील राहावे.

आज्ञेचे पालन अपेक्षित आहे

मग थोडे सखोल दृष्टीने जर पाहिले तर हे स्पष्ट होते की एवढ्या मोठ्या उद्देशासाठी मुस्लिमांनी केवळ एकत्र येणे पुरेसे नाही, तर याचीसुद्धा गरज आहे की हे एकत्र जमा होणे अगदी अचूक पद्धतीने असावे. याचा अर्थ असा की मुस्लिमांची जमाअत अशाप्रकारे बनावी की एक दुसऱ्याशी त्यांचे संबंध जसे चांगले असणे आवश्यक आहेत तसेच असावेत. त्यांच्या पारस्परिक संबंधांत कसलेही वितुष्ट राहता कामा नये. त्यांच्यात पूर्णपणे एकोपा असावा. त्यांनी एका सरदाराच्या आज्ञेचे पालन करावे. त्याच्या आज्ञेनुसार कृती करण्याची सवय त्यांच्यात यावी आणि त्यांना असेही कळावे की आपल्या सरदाराची आज्ञाधारकता त्यांनी कशाप्रकारे व कोठपर्यंत केली पाहिजे आणि अवज्ञेचे कोणते प्रसंग आहेत.

जमाअतसह नमाजचे लाभ

या सर्व गोष्टी लक्षात ठेवून पाहा की जमाअतसह नमाज त्या गोष्टी कशी करते.

एका हाकेवर एकत्रित येणे

अशी आज्ञा आहे की अजानची हाक ऐकल्यावर हातातील काम सोडून द्या आणि मस्जिदकडे धाव घ्या. ही बोलविण्यासाठी दिलेली हाक ऐकून चोहीकडून मुस्लिमांचे उठणे व एका केंद्रावर गोळा होणे त्यांच्यात तीच मन:स्थिती निर्माण करते जी सैन्याची असते. सेनेतील जवान जेथे जेथे असतील ते बिगुलचा आवाज ऐकून असे समजतात की आमचा सेनाधिकारी बोलावीत आहे. या बोलावण्याने सर्वांच्या मनात एकच भावना निर्माण होते आणि ती म्हणजे कमांडराच्या आज्ञेच्या पालनाची भावना. या भावनेनुसार सर्वजण एकच काम करतात. ते म्हणजे आपापल्या जागेवरून तो आवाज ऐकून लगेच धावत सुटतात आणि सर्व बाजूंनी एकत्रित गोळा होतात. सैन्यात ही पद्धत कशासाठी अवलंबिली गेली आहे? ती अशासाठी की प्रथम तर प्रत्येक शिपायाला व्यक्तिश: आज्ञा पाळणे व त्याची तत्परतेने अंमलबजावणी करण्याची पद्धत व सवय लागावी. त्याचबरोबर अशा सर्व आज्ञाधारक शिपायांचा मिळून एक समूह, एक टोळी व एक संघ बनावा आणि त्यांना ही सवय लागावी की कमांडराच्या आज्ञेवर एकाच वेळी, एकाच जागी सर्वांनी एकत्रित यावे जेणेकरून जेव्हा मोहिमेवर जावयाचे असेल तेव्हा संपूर्ण फौजेने एकाच आवाजावर एका उद्देशासाठी एकत्रित होऊन काम

करू शकावे. असे घडू नये की सर्व शिपाई आपापल्या जागी तर मोठे शूर असावेत, परंतु जेव्हा कामाच्या वेळी त्यांना पुकारले जावे तेव्हा ते एकत्रितपणे युद्ध करू न शकावेत. त्या उलट प्रत्येकाने आपापल्या इच्छेनुसार हवे तिकडे निघून जावे. जर अशी स्थिती एखाद्या सेनेची असेल तर त्यातील हजार शूर शिपायांना शत्रूची पन्नास शिपायांची तुकडी वेगवेगळे धरून ठार करू शकेल. बस्स याच तत्त्वावर मुस्लिमांसाठीसुद्धा हाच कायदा लागू केला गेला आहे की ज्या मुस्लिमाने जेथे अजानचा आवाज ऐकला त्याने सर्व काम सोडून आपल्या जवळच्या मस्जिदचा मार्ग धरावा जेणेकरून सर्व मुस्लिमांनी मिळून अल्लाहची फौज बनावे. या सामूहिकतेचा त्यांना दररोज दिवसातून पाच वेळा सराव करविला जातो. त्याला कारण असे की जगातील सर्व फौजांपेक्षा कठोर कामगिरी या अल्लाहच्या फौजेची आहे. दुसऱ्या फौजा तर दीर्घकाळानंतर कधीतरी एखाद्या मोहिमेवर जातात आणि त्याच्या तयारीसाठी त्यांना हे सर्व सैनिक सराव करविले जातात. परंतु या अल्लाहच्या फौजेला तर नेहमीच शैतानी शक्त्यांशी दोन हात करावे लागते आणि प्रत्येक वेळी आपल्या कमांडराच्या आज्ञेचे पालन करावयाचे असते. म्हणून तिला हीदेखील मोठी सवलत आहे की तिने दररोज केवळ पाच वेळा अल्लाहच्या बिगुलाचा आवाज ऐकून धाव घ्यावी व तिला अल्लाहच्या छावणीत म्हणजे मस्जिदमध्ये गोळा होण्याची आज्ञा दिली गेली आहे.

उद्देशपूर्ण संमेलन

हा तर केवळ अजानपासून होणरा लाभ होता. आता आपण मस्जिदमध्ये एकत्रित येता आणि केवळ या एकत्रित येण्यातच अनेक फायदे आहेत. जेव्हा आपण येथे एकत्रित झाला तेव्हा आपण एक दुसऱ्याला पाहिले, ओळखले व एकमेकाशी आपला परिचय झाला. हे पाहणे, ओळखणे व परिचित होणे कोणत्या नात्यने आहे? हे सर्व या नात्याने आहे की आपण सर्वजण अल्लाहचे दास आहात. एकाच पैगंबराचे अनुयायी आहात. एकाच ग्रंथाला मानणारे आहात. एकच उद्देश आपल्या सर्वांच्या जीवनाचा आहे. याच उद्देशाच्या पूर्तीसाठी आपण येथे जमा झालेले आहात आणि हाच उद्देश आपल्याला येथून परत गेल्यावर पूर्ण करावयाचा आहे. अशाप्रकारची ओळख, अशाप्रकारचा परिचय आपल्या मनात आपोआपच हा विचार उत्पन्न करतो की आपण सर्वजण एकाच जातीचे आहात, एकाच फौजेचे शिपाई आहात, एकमेकांचे बंधु आहात. जगातील आपल्या गरजा, आपले उद्देश, आपले नुकसान व आपले फायदे सर्व सामायिक आहेत आणि आपले जीवन एकमेकांशी संलग्न आहेत.

परस्पर सहानुभूती

मग आपण जेव्हा एकमेकाला पाहाल तेव्हा स्पष्ट आहे की डोळे उघडूनच पाहाल आणि हे पाहणेदेखील एका शत्रूने दुसऱ्या शत्रूला पाहणे नसेल तर एका मित्राने मित्राला व एका भावने दुसऱ्या भावाला पाहणे असेल. या दृष्टीने जेव्हा आपण पाहाल की माझा एखादा भाऊ फाटके व जीर्णशीर्ण वस्त्रात आहे, कोणाला चिंतेने ग्रासले आहे, कोणी उपासमारीला बळी पडलेला आहे आणि कोणी लंगडा-लुळा तर कोणी आंधळा आहे, तेव्हा अनायासेच आपल्या मनात सहानुभूती उत्पन्न होईल. आपल्यापैकी जे सुखवस्तू आहेत ते दीन-दुबळ्या व निराधार लोकांवर दया दाखवितील. जे दुर्दशेत आहेत त्यांना श्रीमंताकडे जाण्याचे व त्यांना आपले गाऱ्हाणे ऐकविण्याचे धाडस होईल. एखाद्याविषयी असे कळेल की तो आजारी आहे अथवा एखाद्या संकटात सापडलेला आहे म्हणून मस्जिदमध्ये आला नाही तेव्हा आपल्या मनात त्याची विचारपूस करावयास जाण्याचा विचार येईल. एखाद्या माणसाच्या मृत्यूची दुःखद वार्ता कळली तर सर्वजण मिळून 'नमाजे जनाज़ा' (मृताला सद्‌गती मिळण्यासाठी प्रार्थनेची नमाज) अदा करतील आणि शोकग्रस्तांच्या दुःखात सहभागी होतील. या सर्व गोष्टी आपापसांत पारस्परिक स्नेह संवर्धन करणाऱ्या व एकमेकाला साहाय्यक बनविणाऱ्या आहेत.

पवित्र उद्देशासाठी एकत्रित येणे

यानंतर आणखी थोडा विचार करा. आपण येथे एका पवित्र स्थळी पवित्र उद्देशासाठी एकत्रित झाला आहात. हेच चोरांचे, दारुड्याचे अथवा जुगार खेळणाऱ्यांचे संमेलन नव्हे, की सर्वांच्या मनात अपवित्र विचार असावेत. हे तर अल्लाहच्या दासांचे संमेलन, अल्लाहच्या घरात, अल्लाहची उपासना करण्यासाठी आहे. सर्वजण अल्लाहसमोर त्याचे दास असल्याचे मान्य करण्यासाठी उपस्थित झाले आहेत. अशा प्रसंगी प्रथमतः प्रामाणिक माणसाच्या मनात आपल्या पापाबद्दल लज्जेची भावना निर्माण होते. परंतु जर त्याने आपल्या दुसऱ्या बंधुसमक्ष पाप केले असेल आणि तो स्वतःदेखील मस्जिदमध्ये हजर असेल तर केवळ त्याच्या दृष्टीला दृष्टी भिडणेदेखील पापीला मेल्याहून मेल्यासारखे वाटण्यास पुरेशी आहे. एखादे वेळी जर मुस्लिमांत एक दुसऱ्याला उपदेश करण्याची भावनासुद्धा असली आणि त्यांना माहीत असेल की सहानुभूती व प्रेमाने एकमेकांची सुधारण कशी केली पाहिजे, तर खात्री बाळगा की हे संमेलन ईशकृपा व अत्यंत समृद्धीला आमंत्रित करण्यास कारणीभूत ठरेल. अशाप्रकारे

सर्व मुस्लिम मिळून एकमेकांतील वाईटपणा दूर करतील, एकमेकांतील उणिवांचे उच्चाटन करतील आणि संपूर्ण जमाअत सदाचारी व सद्‌गुणी लोकांची बनत जाईल.

बंधुत्व

हे मस्जिदमध्ये गोळा होण्याचे सुफळ आहे. यानंतर पाहा की जमाअतीसह नमाज अदा करण्यात किती लाभ लपलेले आहेत. आपण सर्वजण एका रांगेत एक दुसऱ्याशी खांद्याला खांदा लावून उभे राहता. कोणीही मोठा अथवा लहान नाही. कोणीही उच्च दर्जाचा अथवा खालच्या दर्जाचा नाही. अल्लाहच्या दरबारात अल्लाहसमोर सर्वजण एकाच दर्जाचे असतात. कोणाचा हात लागल्याने अथवा एखाद्याने स्पर्श केल्याने कोणीही अपवित्र होत नाही. सर्वजण पवित्र आहेत, ते अशासाठी की सर्वजण मानव आहेत, एकाच अल्लाहचे दास आहेत आणि एकाच धर्माला मानणारे आहेत. आपल्यात घराणे, टोळी अथवा देश व भाषांचासुद्धा फरक नाही. कोणी सय्यद आहे, कोणी राजपूत, कोणी जाट व कोणी कोणत्या देशाचा रहिवासी आहे. कोणाची भाषा कोणती तर कोणाची कोणती; परंतु सर्वजण एका रांगेत उभे राहून अल्लाहची उपासना करीत आहेत.

याचा अर्थ असा आहे की सर्वजण एका जातीचे आहेत. हे वंश, कुळ, भावकी व जातीतील विभाजन सर्व खोटे आहे. सर्वांत मोठे नाते आपल्या दरम्यान अल्लाहच्या गुलामीचे व उपासनेचे आहे. जर या सर्व गोष्टींत आपण एक आहात तर मग अन्य एखाद्या बाबतीतसुद्धा वेगळे का आहात?

कृतीशील साम्य

मग जेव्हा आपण एका रांगेत खांद्याला खांदा लावून उभे राहता तेव्हा असे वाटते की एक फौज आपल्या बादशाहसमोर सेवेसाठी उभी आहे. रांगेत उभे राहून आणि मिळून एकत्र कृती केल्याने आपल्या मनात एकतेची भावना उत्पन्न होते. आपल्याला याचा सराव करविला जातो की अल्लाहच्या उपासनेत अशाप्रकारे एक व्हा की सर्वांचे हात एकाच वेळी उचलले जावेत आणि सर्वांचे पाय एकाच वेळी चालावेत, जणू आपण दहा-वीस, संभर अथवा हजार माणसे नाहीत तर सर्वजण मिळून एक व्यक्तीप्रमाणे बनला आहात.

प्रार्थना (दुआ)

या जगात आणि या पंक्तिबद्धतेनंतर आपण काय करता? एका स्वरात आपल्या स्वामीपुढे विनवणी करता-

"इय्याका नअबुदु व इय्याका नस्तईन"

अर्थात- आम्ही सर्वजण तुझीच उपासना करतो आणि तुझ्याकडेच मदत मागतो.

"इहदिनस्सिरातल मुस्तकीम."

अर्थात- आम्हाला सरळमार्गावर चालव.

"रब्बना लकल हम्द"

अर्थात- आमच्या पालनकर्त्या! तुझ्यासाठीच प्रशंसा आहे.

"अस्सलामु अलैना व अला इबादिल्लाहिस्सालिहीन."

अर्थात- आम्हा सर्वांवर सुरक्षा असावी व अल्लाहच्या सदाचारी दासांवर.

मग नमाज संपवून तुम्ही एक दुसऱ्यासाठी सुरक्षा व कृपेची प्रार्थना करता-

"अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाह"

याचा अर्थ असा झाला की तुम्ही सर्वजण एकमेकांचे हितचिंतक आहात. सर्वजण मिळून एकाच स्वामीकडे सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना करता. तुम्ही एकटे एकटे नाही. आपल्यापैकी कोणीही एकटा सर्व काही स्वत:साठीच मागत नाही. प्रत्येकाची अशीच प्रार्थना आहे की सर्वांवर अल्लाहची कृपा असावी. सर्वांना एकाच सरळमार्गावर चालण्याची सद्‌बुद्धी प्राप्त व्हावी आणि सर्वजण अल्लाहच्या सुरक्षिततेत समाविष्ट व्हावेत. अशाप्रकारे ही नमाज मनांना जोडते, विचारांत एकरूपता निर्माण करते आणि आपसांत हितचिंतनाचा संबंध उत्पन्न करते.

इमामशिवाय (नेत्याशिवाय) जमाअत नाही

हे पाहा की तुम्ही जमाअतची नमाज कधीही इमामशिवाय अदा करीत नाही. जरी दोघेजण मिळून नमाज अदा करीत असतील तरी एकजण 'इमाम' (नेतृत्व करणारा) असेल आणि दुसरा 'मुक्तदी' (अनुसरण करणारा). जमाअत उभी असेल तर वेगळे राहून नमाज अदा करण्याची सक्त मनाई आहे. एवढेच नव्हे तर अशाप्रकारे नमाज होतच नाही. अशी आज्ञा आहे की जो जो येईल त्याने त्याच इमामच्या पाठीमागे नमाजमध्ये सामील होत राहावे.

या सर्व गोष्टी केवळ नमाजसाठीच नव्हेत तर यात खरोखर अशी शिकवण दिली गेली आहे की मुस्लिम म्हणून जीवन जगावयाचे असेल तर अशा तऱ्हेची जमाअत (समुदाय) बनून राहा. तुमची जमाअत तोपर्यंत जमाअत होऊच शकत नाही जोपर्यंत तुमचा कोणी इमाम नसेल आणि जमाअत बनल्यास त्यापासून वेगळे होण्याचा अर्थ असा आहे की तुमचे जीवन मुस्लिमाचे जीवन उरले नाही.

इमामतचे (नेतृत्वाचे) स्वरूप व वास्तविकता

केवळ एवढ्यावरच संपले नाही तर जमाअतमध्ये इमाम व मुक्तदींचा संबंध अशाप्रकारे जोडला गेला आहे की ज्याद्वारे कळावे की या लहानशा मस्जिदच्या बाहेर त्या वैभवशाली मस्जिदमध्ये की जिचे नाव 'पृथ्वी' आहे, आपल्या इमामांचे स्थान काय आहे? त्यांची कर्तव्ये कोणती? त्यांचे अधिकार कोणते? त्यांच्या आज्ञेचे पालन कशाप्रकारे केले पाहिजे? आणि कोणत्या बाबतीत केले पाहिजे? जर त्याने चूक केली तर काय करावे? त्याची चूक असल्यास कोठपर्यंत अनुसरण करावे? त्याला कोठे व्यत्यय आणू शकता? कोठे त्याच्याकडे मागणी करू शकता की त्याने चुकीची सुधारणा करावी आणि कोणत्या प्रसंगी आपण त्याला इमामतवरून दूर करू शकता? हा सर्व जणू लहान प्रमाणावर एक महान राज्य चालविण्याचा सराव आहे जो आपल्याकडून दररोज पाच वेळा आपल्या प्रत्येक लहान मस्जिदमध्ये करविला जातो.

इमामसंबंधी अटी व शिष्टाचार

येथे इतका अवधी नाही की मी या सर्व तपशीलाचे वर्णन करावे तथापि काही ढोबळ गोष्टींचे मी वर्णन करीत आहे.

(१) ईशभीरू व भक्त

आज्ञा आहे की इमाम अशा माणसाला बनविले जावे जो धार्मिक असावा, ज्ञानाच्या दृष्टीने श्रेष्ठ असावा, पवित्र कुरआनचे त्याला अधिक ज्ञान असावे, तो वयस्करसुद्धा असावा. हदीसमध्येसुद्धा क्रम दिलेला आहे की या गुणातील कोणता गुण कोणत्या गुणापेक्षा श्रेष्ठ आहे. यातूनच ही शिकवणदेखील दिली गेली आहे की सरदाराच्या निवडणुकीत कोणत्या गोष्टींचा विचार केला पाहिजे.

(२) बहुसंख्यकांचा प्रतिनिधी

आज्ञा आहे की अशा मामसाला इमाम बनविले जाऊ नये ज्याच्यावर बहुसंख्य लोक नाराज असावे. तसे पाहिले तर थोडे-अधिक लोक कुणाचे विरोधक नसतात? परंतु जर जमाअतमध्ये अधिकतर लोक एखाद्याचा तिरस्कार करीत असतील तर त्याला इमाम बनविले जाऊ नये. येथे पुन्हा सरदाराच्या निवडीबद्दल एक कायदा सांगितला आहे.

(३) मुक्तदींचा हितचिंतक

आज्ञा आहे की जो मनुष्य जमाअतचा इमाम बनविला जाईल त्याने अशाप्रकारे नमाजचे संचालन (नेतृत्व) करावे की जमाअतमधील वृद्धतम माणसालादेखील त्रास होऊ नये. केवळ तरुण, सुदृढ, आरोग्यवान व सवड असलेल्या लोकांना दृष्टीसमोर ठेवून लांबलचक 'किरात' (पवित्र कुरआनचे मधुर आवाजात पठण) व दीर्घ रुकूअ व सिजदे करू नयेत, तर हेदेखील पाहावे की जमाअतमध्ये म्हातारे, आजारी व अशक्त आणि असले व्यस्त लोकदेखील आहेत जे नमाज लवकर अदा करून आपल्या कामधंद्याला परत जाऊ इच्छितात. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी या बाबतीत येथपर्यंत दया व प्रेमभावनेचे उदाहरण प्रस्तुत केले की नमाजचे संचालन करीत असता एखाद्या लहान बाळाच्या रडण्याचा आवाज आला तर ते नमाज आटोपती घेत असत जेणेकरून जर बाळाची आई जमाअतमध्ये सामील असेल तर त्या बाळाला त्रास होऊ नये. जणू

सरदाराला अशी शिकवण दिली गेली आहे की जेव्हा त्याला सरदार बनविले जाईल तेव्हा त्याची कार्यपद्धती कशी असावयास पाहिजे.

(४) विवशता असल्यास जागा सोडावी

अशी आज्ञा आहे की जर नमाजचे संचालन करीत असता जर एखादे वेळी अशी घटना घडली की ज्यामुळे इमामला नमाजचे संचालन करणे अशक्य व्हावे तर इमामने ताबडतोब आपली जागा सोडावी व आपल्या जागी मागील माणसाला उभे करावे. याचा अर्थ असा आहे की सरदाराचेसुद्धा हेच कर्तव्य आहे की जेव्हा त्याला कळेल की तो सरदारकीला पात्र नाही तर त्याने स्वत:च बाजूला व्हावे आणि दुसऱ्या योग्य माणसासाठी जागा मोकळी करावी. यात कसल्याही प्रकारची लज्जेची गोष्ट अथवा स्वार्थाची गोष्ट नाही.

(५) इमामचे पूर्णपणे आज्ञापालन

आज्ञा आहे की इमामच्या कृतीचे सक्तीने पालन करा. त्याच्या हालचालीपूर्वी हालचाल करण्यास सक्त मनाई आहे, येथपावेतो की जो मनुष्य इमामच्या अगोदर रुकूअ अथवा सजदा करील त्याच्या बाबतीत हदीसमध्ये म्हटले आहे की त्याला गाढवाच्या रूपात अंतिम दिनी उठविले जाईल. येथे जणू मुस्लिमांना शिकवण दिली आहे की त्यांनी आपल्या सरदाराच्या (नेत्याच्या) आज्ञेचे पालन केले पाहिजे.

(६) चूक केल्याबद्दल समज देणे

जर इमामने नमाजमध्ये चूक केली, उदाहरणार्थ- जेथे त्याने बसणे आवश्यक होते तेथे तो उभा राहिला तर अशा वेळी आज्ञा आहे की "सुबहानल्लाह" म्हणून त्याला चुकीबद्दल समज द्यावी. 'सुबहानल्लाह'चा अर्थ असा आहे की 'अल्लाह पवित्र आहे.' इमामने केलेल्या चुकीबद्दल 'सुबहानल्लाह' म्हणण्याचा अर्थ असा झाला की चुकीपासून केवळ अल्लाहच पवित्र आहे. तुम्ही मनुष्य आहात, तुमच्याकडून चूकभूल होणे काही आश्चर्याची गोष्ट नव्हे. अशी पद्धत आहे इमामला समज देण्याची. जेव्हा त्याला अशी समज दिली जाईल, तेव्हा इमामसाठी हे आवश्यक आहे की त्याने कोणत्याही प्रकारे लज्जेचा अथवा अपमानाचा विचार न करता चुकीची सुधारणा करावी. तथापि जर समज दिली गेली असतादेखील इमामला खात्री असेल की त्याने योग्य कृती केली आहे तर तो आपल्या खात्रीप्रमाणे कृती करू शकतो आणि अशा

स्थितीत जमाअतचे हे कर्तव्य आहे की सदर कृती चुकीची आहे हे जाणूनदेखील इमामप्रमाणे कृती करावी. नमाज संपल्यावर मुक्तदींना हा अधिकार आहे की इमामसमोर त्याची चूक सिद्ध करावी व नमाजचे पुन्हा संचालन करण्याची मागणी करावी.

(७) मअसियत (पापकर्म) मध्ये आज्ञापालन नाही

इमामशी जमाअतचा हा व्यवहार केवळ त्या स्थितीसाठी आहे जेव्हा चूक लहान सहान गोष्टीची असेल. परंतु जर इमामने पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या परंपरेविरूद्ध नमाजची पद्धत बदलली अथवा नमाजमध्ये पवित्र कुरआनचे पठण मुद्दाम चुकीचे केले तर जमाअतचे हे कर्तव्य आहे की त्यांनी तत्काळ नमाज तोडून त्या इमामपासून वेगवे व्हावे.

हे सर्व आदेश असे आहेत ज्यात पूर्ण शिकवण दिली गेली आहे की तुम्ही आपल्या जीवनात आपल्या सरदाराशी कशाप्रकारे वागले पाहिजे.

हे बंधुनो! जमाअतसह नमाजचे जे लाभ मी सांगितले आहेत त्यावरून आपल्याला ही कल्पना आली असेल की महान अल्लाहने दिवसातून पाच वेळा केवळ काही मिनिटांत अदा केली जाणाऱ्या या उपासनेत कशाप्रकारे इहलोक व परलोकातील सर्व कल्याण आपल्यासाठी एकवटले आहेत. केवळ ही एकच गोष्ट आपणास कशाप्रकारे सर्व चांगुलपणाने संपन्न करते आणि आपल्याला कशा तऱ्हेने अल्लाहची गुलामी व जगातील राज्यासाठी तयार करते. आता तुम्ही असा प्रश्न अवश्य कराल की जर नमाज अशी गोष्ट आहे तर जे लाभ आपण याचे सांगता त्यांची प्राप्ती का होत नाही? जर अल्लाहने इच्छिले तर या प्रश्नाचे उत्तर मी आगामी प्रवचनात देईन.

नमाज निष्प्रभ का झाली?

बंधुनो! आजच्या प्रवचनात मला आपणास हे सांगावयाचे आहे की ज्या नमाजचे इतके लाभ मी अनेक प्रवचनांत निरंतर सांगितले आहेत आता ती नमाज ते लाभ का देत नाही? असे काय घडले की आपण नमाज तर अदा करता आणि तरीसुद्धा आपल्या जीवनात सुधारणा होत नाही? तरीसुद्धा आपले चारित्र्य पवित्र होत नाही? तरीसुद्धा आपण एक अल्लाहची महान सेना बनत नाही? तरीसुद्धा आपल्यावर अनेकेश्वरवाद्यांचा पगडा आहे? तरीसुद्धा आपण जगात दुर्दशेने पीडित व गरीब आहात?

या प्रश्नाचे थोडक्यात उत्तर असे असू शकते की प्रथम तर आपण नमाज अदा करीतच नाही आणि जर अदा करीत असालच तर त्या पद्धतीने अदा करीत असाल जी अल्लाह व अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दाखविली आहे. म्हणून त्या लाभांची आपण अपेक्षा करू शकत नाही जे ईमानधारकाला पूर्णत्वाच्या शिखरापर्यंत पोहचविणाऱ्या नमाजपासून पोहचावयास पाहिजेत. परंतु मला माहीत आहे की इतक्या तोकड्या उत्तराने मी आपले समाधान करू शकत नाही. म्हणून थोड्या विस्ताराने आपल्याला ही गोष्ट समजावून देईन.

एक उदाहरण-

घड्याळ

समोर अडकविलेल्या या घड्याळातील अनेक सुटे भाग एक दुसऱ्याशी जुडलेले आहेत. जेव्हा त्याला किल्ली दिली जाते तेव्हा सर्व सुटे भाग आपापले काम सुरू करतात आणि त्यांच्या हालचालींमुळे बाहेरच्या पांढऱ्या तबकडीवर त्यांच्या हालचालींचा परिणाम दिसू लागतो, म्हणजे घड्याळाचे दोन्ही काटे चालून एक एक सेकंद व एक एक मिनिट दाखवू लागतात. आता आपण लक्षपूर्वक पाहा. घड्याळ बनविण्याचा उद्देश आहे की त्याने बिनचूक वेळ दाखवावी. याच उद्देशासाठी घड्याळाच्या यंत्रात ते सर्व सुटे भाग एकत्रित केले आहेत जे बरोबर वेळ दाखविण्यासाठी आवश्यक आहेत. मग त्या सर्वांना जोडले की सर्वांनी मिळून व्यवस्थित हालचाल करावी आणि प्रत्येक भागाने तेच काम व तितकेच काम करीत

राहावे जितके बरोबर वेळ दाखविण्यासाठी आवश्यक आहे. याशिवाय किल्ली देण्याचा नियम ठरविला गेला आहे, जेणेकरून त्या भागांचे कार्य थांबून राहू नये आणि थोड्या थोड्या मुदतीनंतर त्यांना गती दिली जात राहावी. अशाप्रकारे जेव्हा सर्व सुट्या भागांना रीतसर जोडले गेले आणि किल्ली दिली गेली तेव्हा कुठे हे घड्याळ या योग्य बनले की, त्याने तो उद्देश पूर्ण करावा ज्यासाठी त्याची रचना केली गेली आहे. जर त्याला किल्ली दिली नाही तर हे वेळ दाखविणार नाही. जर किल्ली दिली परंतु त्या नियमानुसार दिली नाही जो किल्ली देण्याचा ठरविलेला आहे तर घड्याळ बंद पडेल आणि जरी चालू राहिले तरी बरोबर वेळ दाखविणार नाही. जर त्याचे काही सुटे भाग काढून त्यांच्या जागी सिंगर मशीनचे सुटे भाग लावले आणि किल्ली दिली तर ते वेळही दाखविणार नाही आणि कपडेही शिवणार नाही. जर त्याचे सर्व भाग त्याच्यात राहू दिले परंतु ते उघडून एकमेकांपासून वेगळे केले तर किल्ली दिल्याने कोणताही भाग हालचाल करणार नाही. तसे सांगायला तर सर्व सुटे भाग आत असतील, परंतु केवळ सुटे भाग असल्याने तो उद्देश पूर्ण होणार नाही ज्याच्यासाठी घड्याळ बनविले गेले आहे. कारण त्यांचा क्रम व त्यांचा आपसांतील संबंध आपण तोडून टाकला आहे. म्हणून ते मिळून हालचाल करू शकत नाहीत. या सर्व स्थिती ज्या मी तुम्हासमोर मांडल्या आहेत त्यातील घड्याळाचे अस्तित्व आणि त्याला किल्ली देण्याची क्रिया या दोन्ही जरी खराब झाल्या तरी लांबून पाहणारा असे सांगू शकत नाही की हे घड्याळ नव्हे किंवा त्याला किल्ली दिली जात नाही. तो तर असेच म्हणेल की रूप तर अगदी घड्याळासारखे आहे आणि अशीच अपेक्षा करील की घड्याळापासून जो लाभ होतो तो यापासून प्राप्त झाला पाहिजे. अशाचप्रकारे जेव्हा तो तुम्हाला किल्ली देताना पाहील तर असाच विचार करील की तुम्ही खरोखर घड्याळाला किल्ली देत आहात आणि अशीच अपेक्षा बाळगील की घड्याळाला किल्ली देण्याचा जो परिणाम होतो तो स्पष्टपणे दिसून आला पाहिजे. परंतु जर हे घड्याळ केवळ दुरून पाहण्याचेच आहे आणि प्रत्यक्षपणे त्यात घड्याळपण उरलेले नाही, तर अशा स्थितीत ही अपेक्षा कशी पुरी होऊ शकेल?

उम्मते मुस्लिमाहचा (पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अनुयायी) उद्देश

हे उदाहरण जे मी सांगितले आहे त्यावरून आपल्याला संपूर्ण गोष्ट लक्षात येईल. समजा की इस्लाम घड्याळ आहे. ज्याप्रकारे घड्याळाचा उद्देश बिनचूक वेळ दाखविणे आहे त्याचप्रकारे इस्लामचा उद्देश असा आहे की पृथ्वीवर आपण अल्लाहचे प्रतिनिधी, सृष्टीवर अल्लाहची ग्वाही देणारे आणि जगात सत्य आवाहनकार्याचे ध्वजवाहक बनून राहावे, स्वत: अल्लाहच्या आज्ञेप्रमाणे वागावे, सर्वांवर अल्लाहची आज्ञा चालवावी आणि सर्वांना अल्लाहच्या कायद्याच्या अधीन ठेवावे. या उद्देशासंबंधी पवित्र कुरआनमध्ये स्पष्टपणे सांगितले आहे,

> "आता जगात तो सर्वोत्तम जनसमुदाय तुम्ही आहात ज्याला अखिल मानवजातीच्या मार्गदर्शनासाठी व सुधार करण्यासाठी अस्तित्वात आणले गेले आहे. तुम्ही सदाचाराचा आदेश देता व दुराचारापासून प्रतिबंध करता आणि अल्लाहवर ईमान बाळगता." (दिव्य कुरआन, ३ : ११०)

> "आणि अशाच प्रकारे तर आम्ही तुम्हाला (मुस्लिमांना) एक उत्तम समाज बनविले आहे जेणेकरून जगांतील लोकांवर तुम्ही साक्ष व्हा."
> (दिव्य कुरआन, २ : १४३)

> "अल्लाहने वचन दिले आहे तुमच्यापैकी त्या लोकांना जे ईमान आणतील आणि सत्कृत्ये करतील. तो त्यांना पृथ्वीतलावर आपला प्रतिनिधी बनवील."
> (दिव्य कुरआन, २४ : ५५)

> "युद्ध करा ग्रंथधारकांपैकी त्या लोकांविरूद्ध जे अल्लाहवर व मरणोत्तर जीवनावर श्रद्धा ठेवत नाहीत, आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराने जे काही निषिद्ध ठरविले आहे त्याला निषिद्ध करीत नाहीत, आणि सत्य धर्माला आपला धर्म बनवीत नाहीत." (दिव्य कुरआन, ९ : २९)

घड्याळाच्या सुट्या भागाप्रमाणे इस्लामी आज्ञा परस्परांशी संबंधित आहेत

या उद्देशाच्या पूर्ततेसाठी घड्याळाच्या भागाप्रमाणे इस्लाममध्येदेखील ते सर्व भाग गोळा केले गेले आहेत जे या गरजेसाठी आवश्यक व अनुरूप होते. धर्माच्या श्रद्धा व चारित्र्याचे नियम, व्यवहाराचे कायदे, अल्लाहचे अधिकार, दासांचे अधिकार, आपल्या स्वतःचे अधिकार, जगात ज्याच्याशी आपला संबंध येतो त्या प्रत्येक गोष्टीचा अधिकार, कमविण्याचे नियम आणि खर्च करण्याच्या पद्धती, युद्धाचे नियम व तहाचे नियम, राज्य करण्याचे कायदे आणि इस्लामी राज्याची आज्ञा पाळण्याची पद्धत, हे सर्व इस्लामचे सुटे भाग आहेत आणि त्यांना घड्याळाच्या सुट्या भागाप्रमाणे एका अशा पद्धतीने एक दुसऱ्याशी बांधले आहे की किल्ली दिल्याबरोबर प्रत्येक भागाने दुसऱ्या भागाबरोबर मिळून हालचाल करू लागावे आणि त्या सर्वांच्या हालचालीचा परिणाम म्हणजे इस्लामचा प्रभाव व जगावर अल्लाहच्या कायद्याचे राज्य अशाप्रकारे निरंतर प्रकट होण्यास सुरूवात व्हावी, ज्याप्रमाणे हे घड्याळ आपण पाहत आहात की त्याच्या सुट्या भागांच्या हालचालीबरोबरच बाहेरच्या पांढऱ्या तबकडीवर परिणाम निरंतर जाहीर होत आहेत. घड्याळात सुट्या भागांना एकमेकांशी बांधलेले राहण्यासाठी काही खिळे व काही पाते लावले गेले आहेत. अशाचप्रकारे इस्लामच्या सर्व भागांना एक दुसऱ्याशी जुडलेले ठेवण्यासाठी व त्याचा योग्य क्रम टिकवून ठेवण्यासाठी ती गोष्ट ठेवली गेली आहे जिला 'निजामे जमाअत' (जमाअतची व्यवस्था) म्हटले जाते. म्हणजे मुस्लिमांचा एक असा सरदार ज्याला 'दीन'चे (धर्माचे) बरोबर ज्ञान असावे व ज्यात ईशभीरूतेचे गुण असावे. जमाअतच्या बुद्धिवंतांनी मिळून त्याला मदत करावी, जमाअतच्या हातापायांनी त्याची आज्ञा पाळावी. त्या सर्वांच्या शक्तीने त्याने इस्लामचे कायदे लागू करावेत आणि लोकांना त्या कायद्यांचे उल्लंघन करण्यापासून परावृत्त करावे. अशा तऱ्हेने जेव्हा सर्व भाग एकमेकांशी जुडतील आणि त्याचा क्रम व्यवस्थितपणे कायम ठेवला जाईल तेव्हा त्यांना गती देण्यासाठी आणि देत राहण्यासाठी किल्लीची गरज असेल आणि तीच किल्ली ही नमाज आहे जी दररोज पाच वेळा अदा केली जाते. याशिवाय या घड्याळाची वरचेवर सफाई करण्याची आवश्यकता आहे आणि त्या सफाईसाठी उपवास (रोजे) आहेत जे वर्षातून तीस दिवस ठेवले जातात. या घड्याळाला तेल देत राहणे आवश्यक असते. 'जकात' (संपत्तीवरील

अडीच टक्केप्रमाणे प्रत्येक वर्षी दिले जाणारे दान) ते तेल आहे जे वर्षातून त्याच्या सुट्या भागांना एकदा दिले जाते. हे तेल कुठून बाहेरून येत नाही तर याच घड्याळाचे काही भाग तेलाची निर्मिती करतात आणि काही वाळलेल्या भागांना तेलकट बनवून सहजपणे चालण्यायोग्य बनवितात. त्याशिवाय या घड्याळाला 'ओव्हर ऑइल' करण्याची गरज भासते. त्यासाठी 'ओव्हर ऑइलिंग' हजयात्रा आहे जी आयुष्यात एकदा करणे आवश्यक आहे आणि त्यापेक्षा अधिक वेळा केल्यास अधिक चांगले.

विभिन्न सुट्या भागांची जोडणी उपयुक्त नाही

आता हे लक्षात घ्या की किल्ली देणे, सफाई करणे, तेल देणे व 'ओव्हर ऑइलिंग' करणे त्याच वेळी तर उपयुक्त ठरू शकतात जेव्हा या फ्रेममध्ये याच घड्याळाचे सर्व सुटे भाग असतील, ते एक दुसऱ्याशी त्याच क्रमाने जोडलेले असावेत ज्या क्रमाने वॉचमेकरने जोडले होते आणि ते इतके तयार असावेत की किल्ली दिल्याबरोबर त्यांनी आपली ठराविक कृती सुरू करावी आणि त्यांच्या हालचालीने योग्य परिणाम दिसू लागला. परंतु येथे तर मामलाच वेगळा झालेला आहे. प्रथम तर ती जमाअतची व्यवस्थाच शिल्लक राहिली नाही की ज्याने घड्याळाच्या सुट्या भागांना एकत्रित जोडून ठेवले होते. त्याचा परिणाम असा झाला की सर्व पेच ढिले पडले आणि सर्व भाग वेगळे वेगळे होऊन विस्कटले गेले. आता ज्याच्या मनात जे येईल तो ते करीत आहे. कोणी विचारणा करणारच नाही, प्रत्येकजण स्वतंत्र आहे. जर त्याची इच्छा असेल तर त्याने इस्लामच्या कायद्यानुसार वागावे आणि इच्छा नसेल तर तसे वागू नये. यावरदेखील आपल्या मनाला शांती लाभली नाही तर आपण या घड्याळाचे अनेक सुटे भाग काढून टाकले आणि त्यांच्याऐवजी प्रत्येकाने आपापल्या आवडीप्रमाणे हव्या त्या यंत्राचा भाग आणून त्यात लावला. एखाद्या महाशयांनी सिंगर मशीनचा भाग पसंत करून आणला तर कुणी पिठाच्या गिरणीचा एखादा भाग उचलून आणला तर कुणी मोटार लॉरीचा एखादा भाग आणून घड्याळात लावला. आता आपण मुस्लिमही आहात आणि बँकेशी व्याजाचा व्यवहारही करता, विमा कंपनीत विमाही उतरविला आहे. न्यायालयात खोटे खटलेसुद्धा दाखल करता. अनेकेश्वरत्वाची प्रामाणिकपणे सेवाही करता. मुली, भगिनी आणि पत्नींना मेमसाहेबसुद्धा बनविले जात आहे. मुलांना भौतिकवादी शिक्षणसुद्धा दिले जात आहे. महात्मा गांधींचे अनुकरण व लेनिन साहेबांचा राग आळविला जात आहे. थोडक्यात असे की कोणतीही इस्लामेतर गोष्ट

अशी नाही की जिला आमच्या मुस्लिम बंधुंनी आणून इस्लामच्या या घड्याळाच्या फ्रेममध्ये खुपसले नसेल.

अनपेक्षित परिणामांचे कारण

ही सर्व कृत्ये केल्यानंतर आता आपली अशी अपेक्षा आहे की किल्ली दिल्याबरोबर घड्याळाने चालावे व तोच परिणाम दाखवावा ज्याच्यासाठी घड्याळाची निर्मिती केली गेली आहे. सफाई केल्याने, तेल दिल्याने आणि ओव्हर ऑइल केल्याने तेच फायदे व्हावेत जे ही कामे केल्याने अपेक्षित आहेत. परंतु आपण थोडा बुद्धीचा प्रयोग केला तर सहजपणे लक्षात येईल की जी दुर्दशा आपण घड्याळाची केली आहे त्यामुळे तर आयुष्यभर किल्ली देऊन, सफाई करून व तेल देत राहूनदेखील कोणताही अपेक्षित परिणाम दिसणार नाही. जोपर्यंत आपण बाहेरून आणून लावलेले सर्व सुटे भाग काढून टाकून त्यांच्या जागी मूळचे सुटे भाग क्रमवार लावून आवळीत नाही जसे पूर्वी मुळात आवळलेले होते तोपर्यंत तुम्ही त्या परिणामांची कदापि अपेक्षा करू शकत नाही जे मुळात दिसून येत असत.

उपासना परिणामहीन होण्याचे मूळ कारण

चांगल्या प्रकारे लक्षात ठेवा की नमाज, उपवास (रोजे) जकात व हज परिणामहीन होण्याचे हेच मूळ कारण आहे. प्रथम तर आपल्यापैकी नमाज अदा करणारे, उपवास ठेवणारे आणि जकात व हज अदा करणारे आहेत तरी किती? जमाअतची व्यवस्था विस्कटल्याने प्रत्येकजण स्वत: स्वैर व बेलगाम झालेला आहे. ही कर्तव्ये तो पूर्ण करो की न करो, कोणीही विचारणा करणारा नाही. शिवाय जे लोक ही कर्तव्ये पूर्ण करतात, तेही कसे करतात? नमाज अदा करण्यात नियमितपणा नाही. मस्जिदमध्ये इमामतसाठी (नमाजचे नेतृत्व करण्यासाठी) त्या लोकांची निवड होते जे जगातील कोणतेही दुसरे काम करण्यास लायक नसतात. मस्जिदच्या भाकऱ्या खाणारे, अशिक्षित, धैर्यहीन आणि चारित्र्यहीन लोकांना नमाजचे इमाम बनविले गेले आहे जी आपल्याला अल्लाहचा प्रतिनिधी व जगात अल्लाहचा फौजदार बनविण्यासाठी निश्चित केली गेली होती. त्याचप्रमाणे रोजे, जकात व हजची जी दशा आहे तीसुद्धा सांगण्याजोगी नाही. या सर्व गोष्टी असूनदेखील तुम्ही सांगू शकता की अद्यापदेखील अनेक मुस्लिम आपली धार्मिक कर्तव्ये अवश्य पूर्ण करतात. परंतु जसे मी पूर्वी

सांगितले आहे की घड्याळाचा प्रत्येक भाग वेगळा वेगळा करून त्यात बाहेरच्या अनेक वस्तू घालून जर आपण किल्ली दिली किंवा दिली नाही, सफाई केली किंवा नाही केली, तेल दिले किंवा नाही दिले, दोन्ही निष्फळ आहेत. आपले हे घड्याळ लांबून घड्याळच दिसते. पाहणारा तर असेच म्हणतो की हा इस्लाम आहे आणि तुम्ही मुस्लिम आहात. तुम्ही जेव्हा या घड्याळाला किल्ली देता आणि स्वच्छ करता तेव्हा लांबून पाहणारा असेच समजतो की खरोखर तुम्ही किल्ली देत आहात आणि सफाई करीत आहात. कोणी असे म्हणू शकत नाही की ही नमाज नमाज नाही, हे उपवास उपवास नाहीत, परंतु बिचाऱ्या पाहणाऱ्याला काय कल्पना की या दर्शनी फ्रेममध्ये कसले कारस्थान केले गेले आहेत.

आमची दुःखद अवस्था

बंधुनो! मी आपल्याला मूळ कारण सांगितले आहे की आपली ही धार्मिक कर्मे हल्ली परिणामहीन का होत आहेत? आणि नमाज अदा करून व उपवास ठेवूनदेखील आपण ईशफौजदार बनण्याऐवजी अनेकेश्वरवाद्यांचे कैदी व प्रत्येक अत्याचाऱ्याच्या अत्याचाराला बळी पडत आहोत. परंतु जर आपण वाईट वाटून घेतले नाही तर मी आपल्याला याच्यापेक्षा शोचनीय गोष्ट सांगतो. या दुःखद स्थितीची व संकटाची आपल्याला अवश्य जाणीव आहे, परंतु आपल्यातील हजारांपैकी नऊशे नव्यान्नव नव्हे तर त्यापेक्षाही अधिक लोक असे आहेत जे ही स्थिती बदलण्यास आवश्यक असलेल्या गोष्टी करावयास राजी नाहीत. ज्या घड्याळाचा प्रत्येक भाग आतून वेगळा केला गेला आहे आणि ज्यात आपापल्या आवडीप्रमाणे प्रत्येक माणसाने कोणती न कोणती वस्तू खुपसली आहे. इस्लामच्या त्या घड्याळाची पुनर्रचना करणे ते लोक सहन करू शकत नाहीत. त्याला कारण असे की जेव्हा बाहेरून आणून घातलेल्या वस्तू त्यातून बाहेर काढल्या जातील तेव्हा अनिवार्यपणे प्रत्येकाच्या आवडीची वस्तू बाहेर काढली जाईल. असे तर घडणार नाही की दुसऱ्याच्या पसंतीच्या वस्तू काढल्या जातील. परंतु आपण स्वतः बाहेरून आणून लावलेला सुटा भाग तसाच ठेवला जाईल. अशाचप्रकारे जेव्हा त्याला आवळले जाईल तेव्हा सर्वचजण त्याच्याबरोबर आवळले जातील. हे शक्य नाही की दुसऱ्या सर्वांना तर आवळले जावे, पण केवळ आपणच असा भाग आहात जो ढिला सोडला जावा. बस हीच ती गोष्ट आहे की जेव्हा त्याला आवळले जाईल तेव्हा तेदेखील त्याच्याबरोबर आवळले जातील आणि हा असला त्रास आहे जो

आनंदाने व आवडीने सहन करणे लोकांसाठी कठीण आहे. म्हणून ते केवळ अशी अपेक्षा करतात की हे घड्याळ अशाच स्थितीत भिंतीची शोभा बनून राहावे आणि लांब लांबून लोकांना आणून त्या घड्याळाचे दर्शन घडवावे आणि त्यांना सांगितले जावे की या घड्याळात अमुक अमुक चमत्कार लपलेले आहेत. यापेक्षा अधिक ज्या लोकांना या घड्याळाबद्दल आपुलकी आहे त्यांनी खूप मन लावून किल्ली द्यावी आणि अत्यंत परिश्रमाने सफाई करीत राहावे, परंतु दुःखाची गोष्ट अशी की त्याच्या सुट्या भागांची पुनर्रचना करण्याची, ते आवळण्याची व बाहेरून आणलेले सुटे भाग काढून फेकण्याची इच्छादेखील केली जाऊ नये!

आपल्या इच्छेप्रमाणे मी वागू शकलो असतो तर किती चांगले झाले असते! परंतु मी काय करू? जे काही मला माहीत आहे त्याच्याविरूद्ध मी सांगू शकत नाही. मी आपल्याला खात्री देतो की ज्या स्थितीत आपण सध्या आहात त्यात आपण जरी पाच वेळेच्या नमाजबरोबरच 'तहज्जुद' (मध्यरात्रीनंतरची नमाज), 'इशराक' (सूर्योदयानंतर वीस मिनिटांनी अदा करावयाची नमाज) आणि 'चाश्त'ची नमाज (सकाळी सूर्य थोडा वर आल्यावर अदा करावयाची नमाज) सुद्धा अदा करू लागला आणि दररोज पाच पाच तास पवित्र कुरआनचे पठण करू लागला व रमजान महिन्याव्यतिरिक्त अकरा महिन्यांतून साडे पाच महिन्यांचे अधिक उपवास ठेवू लागला तरीसुद्धा कोणतीही प्राप्ती होणार नाही. घड्याळात त्याचे मूळ सुटे भाग ठेवले आणि त्यांना आवळले तर थोडीशी किल्ली दिली तरी ते चालू लागेल, थोडीशी सफाई व थोडे तेल लावणेदेखील परिणामकारक ठरेल. असे न केल्यास आपण जरी आयुष्यभर किल्ली देत राहिला तरी घड्याळ अजिबात चालणार नाही.

उपवास (रोजा)

प्रत्येक पैगंबराच्या अनुयायांसाठी (उम्मतसाठी) उपवास अनिवार्य केला गेला

बंधुनो! दुसरी उपासना जी अल्लाहने आपल्यासाठी अनिवार्य केली ती आहे उपवास (रोजा). उपवासाचा अर्थ आहे सकाळपासून संध्याकाळपर्यंत माणसाने खाणे-पिणे व संभोगाचा त्याग करावा. नमाजप्रमाणेच ही उपासनासुद्धा प्रारंभापासूनच सर्व पैगंबरांच्या शरियत (धार्मिक कायदा) मध्ये अनिवार्य राहिली आहे. मागील ज्या अनेक उम्मत होऊन गेल्या आहेत, सर्व त्याचप्रमाणे उपवास ठेवीत असत, जसे पैगंबर मुहम्मद (स.) यांची उम्मत ठेवीत आहे. तथापि उपवासासंबंधीचे आदेश, उपवासांची संख्या व उपवास ठेवण्याच्या काळात विभिन्न शरियतमध्ये भिन्नता आढळते. आजदेखील आम्ही पाहतो की बहुतेक धर्मांत उपवास कोणत्या न कोणत्या स्वरूपात अस्तित्वात आहे. तथापि लोकांनी आपल्याकडून अनेक गोष्टी जोडून त्याचे स्वरूप बिघडविले आहे. पवित्र कुरआनमध्ये म्हटले आहे,

> "हे ईमानधारकांनो! विहिति केले तुमच्यावर उपवास जसे विहित केले होते तुमच्या पूर्वीच्यांवर जेणेकरूण तुम्ही ईशपरायण व्हाल."
>
> (दिव्य कुरआन, २: १८३)

या आयतीवरून असे कळते की महान अल्लाहकडून ज्या अनेक शरियत आल्या आहेत, त्यामध्ये उपवासाची उपासना अवश्य होती.

उपवास अनिवार्य का केला गेला?

विचार करा की अखेर उपवासात ती कोणती गोष्ट आहे की ज्यामुळे महान अल्लाहने या उपासनेला प्रत्येक काळात अनिवार्य केले आहे?

जीवनाचा उद्देश - पालनकर्त्याची गुलामी

यापूर्वी मी अनेक वेळा आपल्याला सांगितले आहे की इस्लामचा मूळ उद्देश माणसाच्या संपूर्ण जीवनाला महान अल्लाहची उपासना बनविणे होय. मनुष्य 'अब्द' म्हणजे दास म्हणून जन्मला आहे आणि दासता अथवा गुलामी त्याचा अगदी जन्मजात

गुण आहे. म्हणून उपासना (इबादत) अर्थात विचार व कृतीमध्ये अल्लाहची गुलामी करण्यापासून कदापि एक क्षणभरदेखील त्याने मुक्त राहता कामा नये. त्याने आपल्या जीवनाच्या प्रत्येक बाबीत सदैव प्रत्येक वेळी असे पाहिले पाहिजे की महान अल्लाहची प्रसन्नता कोणत्या गोष्टीत आहे आणि त्याचा प्रकोप व नाराजी कोणत्या गोष्टीत आहे. मग जिकडे अल्लाहची प्रसन्नता असेल तिकडे जावे आणि ज्यात त्याचा प्रकोप व त्याची नाराजी असेल त्यापासून अशाप्रकारे लांब राहावे जसे एखादा अग्नीच्या निखाऱ्यापासून दूर राहतो. जी पद्धत अल्लाहला पसंत असेल तिचा अवलंब केला पाहिजे आणि जी पद्धत त्याला पसंत नसेल त्यापासून दूर राहावे. जेव्हा माणसाचे संपूर्ण जीवन अशा रंगात रंगून जाईल तेव्हा असे समजावे की त्याने आपल्या स्वामीच्या गुलामीचा हक्क अदा केला आणि– "मी जिन्न आणि माणसांना याशिवाय कोणत्याही अन्य कामासाठी निर्माण केले नाही की त्यांनी माझी भक्ती करावी." (दिव्य कुरआन, ५१ : ५६) ची मनीषा पूर्ण केली.

उपासना - गुलामीचे प्रशिक्षण

ही गोष्टदेखील मी यापूर्वी सांगितली आहे की नमाज, उपवास, हज व जकातच्या नावाने ज्या उपासना आमच्यासाठी अनिवार्य केल्या गेल्या आहेत, त्यांचा मूळ उद्देश याच मोठ्या उपासनेसाठी आम्हाला तयार करणे होय. त्या अनिवार्य करण्याचा अर्थ असा नव्हे की जर तुम्ही पाच वेळ रुकूअ (नमाजमध्ये गुडघ्यावर हात ठेवून उभे राहणे) व सजदे (नमाजमध्ये हात, पाय, गुडघे व कपाळ जमिनीवर टेकणे) केले. रमजान महिन्यात तीस दिवस पहाटेपासून संध्याकाळपर्यंत भूक व तहान सहन केली, श्रीमंत असल्यास वार्षिक जकात (दर साल दर शेकडा अडीच टक्के प्रमाणे दान देणे) दिली आणि आयुष्यात एकदा हजयात्रा केली, अल्लाहचा जो काही हक्क तुमच्यावर होता तो अदा झाला आणि यानंतर तुम्ही त्याच्या गुलामीतून मुक्त झाला आणि तुम्ही वाटेल ते करीत फिरावे, तर मुळात या उपासना अनिवार्य करण्याचा उद्देशच असा आहे की यांच्याद्वारे माणसाला प्रशिक्षण दिले जावे आणि त्याला असे योग्य बनवावे की त्याचे संपूर्ण जीवन अल्लाहची उपासना बनावे. या, आता हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून पाहू की उपवास (रोजा) कशाप्रकारे माणसाला या मोठ्या उपासनेसाठी तयार करतो.

रोजा गुप्त उपासना आहे

उपवासाशिवाय अन्य जितक्या उपासना आहेत त्या कोणत्या न कोणत्या दृश्य कृतीने केल्या जातात. उदाहरणार्थ- नमाजमध्ये मनुष्य उठतो, बसतो, रुकूअ व सजदा करतो, ते सर्व लोक पाहतात. हजयात्रेला मनुष्य लांबचा प्रवास करून पोहचतो आणि हजारो, लाखो लोकांसमवेत प्रवास करतो. जकातसुद्धा कमीतकमी एक मनुष्य देतो व दुसरा घेतो. या सर्व उपासना लपलेल्या नाहीत. जर ती उपासना आपण केली तरी लोकांना कळते आणि आपण केली नाही तरी लोकांना कळते.

या उलट उपवास एक अशी उपासना आहे जिच्याबद्दल अल्लाह व त्याच्या दासाव्यतिरिक्त अन्य कोणालाही कल्पना येऊ शकत नाही. एखादा मनुष्य सर्वांसमोर 'सहरी' (उपवास सुरू होण्यापूर्वी पहाटे केलेले जेवण) खातो आणि 'इफ्तार' (संध्याकाळी काही खाऊन उपवास सोडणे) करण्याची वेळ येईपर्यंत कोणासमोर खात-पीत नाही, परंतु लपून-छपून पाणी पितो, तर अल्लाहशिवाय अन्य कोणालाही याची बातमी कळू शकत नाही. सारे जग असेच समजेल की त्याचा उपवास आहे, परंतु खरोखर त्याचा उपवास नसतो.

रोजा - ईमानच्या दृढतेचे चिन्ह

उपवासासाठी असलेले हे बंधन लक्षात ठेवून विचार करा की जो मनुष्य खरोखर उपवास करतो आणि लपून-छपून काही खात-पीत नाही, भयंकर उष्णतेमुळे जेव्हा घसा कोरडा पडतो तेव्हा पाण्याचा एक थेंबदेखील घशाखाली उतरवीत नाही. खूप भूक लागली असता, जेव्हा प्राण डोळ्यांत आले असतादेखील ज्याला एखादा पदार्थ खाण्याचा विचारदेखील शिवत नाही त्याला अल्लाह परोक्षाचे ज्ञान ठेवणारा असल्याबद्दल विश्वास असतो. त्याला खात्रीपूर्वक माहीत असते की कोणतीही त्याची कृती जरी जगाच्या डोळ्यांपासून लपली तरी ती अल्लाहपासून लपू शकत नाही. अल्लाहची किती भीती त्याच्या हृदयात आहे! मोठ्यात मोठा त्रास तो सहन करतो, परंतु केवळ अल्लाहच्या भयामुळे तो असले कोणतेही कृत्य करीत नाही की ज्यामुळे त्याचा उपवास मोडावा. त्याला परलोकातील बक्षीस व शिक्षेबद्दल किती विश्वास आहे की महिन्याभरात कमीतकमी तो तीनशे साठ तास उपवास ठेवतो. या दरम्यान एका क्षणासाठीसुद्धा त्याच्या मनात परलोकासंबंधी लेशमात्र शंका येत नाही. कसली ही दृढ

श्रद्धा! जर त्याला या गोष्टीबद्दल थोडीदेखील शंका असती की निर्णयाचा दिवस येईल किंवा नाही आणि त्यात शिक्षा व पुण्यरूपी बक्षीस असेल किंवा नाही तर तो कधीच आपला उपवास पूर्ण करू शकला नसता. शंका आल्यास हे शक्य नाही की मनुष्य अल्लाहच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी काहीही न खाण्याच्या व न पिण्याच्या इच्छेवर दृढ राहील.

एका महिन्याचे निरंतर प्रशिक्षण

अशाप्रकारे महान अल्लाह प्रत्येक वर्षी पूर्ण एक महिनाभर मुस्लिमांच्या ईमानला अखंडपणे कसोटीला लावतो. या कसोटीत मनुष्य जितका-जितका खरा उतरतो तितकाच त्याचा ईमान (अल्लाहवरील विश्वास) अधिकाधिक दृढ होतो. ही कसोटीही आहे व प्रशिक्षण (ट्रेनिंग) सुद्धा.

आपण जेव्हा एखाद्याजवळ ठेव ठेवता तेव्हा जणू त्या माणसाच्या प्रामाणिकपणाची परीक्षाच घेता. जर तो कसोटीला पुरा उतरला आणि ठेवीत अप्रामाणिकपणा दाखविला नाही तर त्याच्यात ठेवींचा सांभाळ करण्याची अधिक शक्ती उत्पन्न होते आणि तो अधिकाधिक प्रामाणिक ठेवी ठेवणारा बनत जातो.

अशाचप्रकारे महान अल्लाहसुद्धा निरंतर एक महिनाभर दररोज बारा-बारा, चौदा-चौदा तास आपल्या ईमानाची कठोर परीक्षा घेतो व जेव्हा आपण कसोटीवर पुरे उतरता तेव्हा आपल्यात या गोष्टीची अधिक क्षमता उत्पन्न होते की अल्लाहचे भय बाळगून अन्य पापांपासून दूर राहावे, अल्लाहला परोक्षाचे ज्ञान राखणारा समजून लपून-छपूनदेखील त्याच्या कायद्यांचे उल्लंघन करू नये. प्रत्येक वेळी कयामतच्या (अंतिम दिनाच्या) त्या दिवसाची आठवण करावी जेव्हा सर्व काही उघड होईल व कसलीही सवलत न देता चांगल्याचे चांगले व वाईटाचे वाईट फळ दिले जाईल आणि असाच अर्थ आहे खालील आयतीचा-

"हे ईमानधारकांनो! विहित केले तुमच्यावर उपवास जसे विहित केले होते तुमच्या पूर्वीच्यांवर जेणेकरूण तुम्ही ईशपरायण व्हाल."

(दिव्य कुरआन, २:१८३)

आज्ञापालनाचा दीर्घ सराव

उपवासाचे एक अन्य वैशिष्ट्यसुद्धा आहे, ते असे की उपवास एका दीर्घ मुदतीपर्यंत शरियतच्या (धार्मिक कायद्याच्या) आदेशाचे निरंतर पालन करवितो. नमाजची मुदत एका वेळी काही मिनिटांपेक्षा अधिक नसते. जकात अदा करण्याची वेळ वर्षातून एकदा येते. तथापि हजसाठी मात्र दीर्घ मुदत लागते. परंतु ती वेळसुद्धा आयुष्यभरात एकदाच येते आणि तीसुद्धा सर्वांसाठी नाही.

या सर्वांच्या उलट प्रत्येक वर्षी रोजा (उपवास) एका महिन्यापर्यंत रात्रंदिवस पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शरियतच्या पालनाचा सराव करवितो. पहाटे सहरीसाठी उठा, अगदी अमुक वेळी खाणे-पिणे बंद करा, दिवसभर अमुक-तमुक कामे करू शकता व अमुक-अमुक कामे करू शकत नाही. संध्याकाळी बरोबर अमुक वेळी इफ्तारी करा, मग जेवण करून विश्रांती घ्या. त्यानंतर तरावीहला (रमजान महिन्यात इशाच्या नमाजनंतर अदा केली जाणारी वीस रकअतची नमाज) जा.

अशाप्रकारे प्रत्येक वर्षी पूर्ण महिनाभर सकाळपासून संध्याकाळपर्यंत व रात्रीपासून सकाळपर्यंत मुस्लिमांना निरंतर सैनिकाप्रमाणे पूर्ण कायदा व व्यवस्थेत बांधून ठेवले जाते आणि मग अकरा महिने त्याला सोडून दिले जाते की जेणेकरून त्याने जे प्रशिक्षण एका महिन्यात घेतले आहे त्याचा परिणाम दिसून यावा आणि जी उणीव राहील ती दुसऱ्या वर्षाच्या प्रशिक्षणात भरून काढली जावी.

प्रशिक्षणासाठी साजेशे सामूहिक वातावरण

अशाप्रकारच्या प्रशिक्षणासाठी एकेका माणसाला घेऊन त्याला तयार करणे योग्य नसते. आपण पाहता की सैन्यातदेखील एकेका माणसाकडून वेगळे वेगळी कवायत करविली जात नाही तर पूर्ण फौज एकाच रेळी कवायत करते. सर्वांना एकाच वेळी बिगुलच्या आवाजावर उठावे लागते आणि बँडच्या आवाजावर काम करावे लागते, जेणेकरून त्यांना जमाअत (समूह) बनून एकत्रितपणे काम करण्याची सवय लागावी आणि त्याचबरोबर त्या सर्वांनी एक दुसऱ्याच्या प्रशिक्षणात साहाय्यक सिद्ध व्हावे, म्हणजे एका सैनिकाच्या प्रशिक्षणात जो दोष राहिला असेल तो दुसऱ्या सैनिकाने दूर करावा व दुसऱ्याचा दोष तिसऱ्याने दूर करावा.

अशाप्रकारे इस्लाममध्येसुद्धा रमजान महिना उपवासाच्या उपासनेसाठी निश्चित

केला गेला आहे आणि सर्व मुस्लिमांना आज्ञा दिली गेली आहे की सर्वांनी मिळून एकाच वेळी उपवास करावेत. या आज्ञेने वैयक्तिक उपासनेला सामूहिक उपासना बनविले. एकेका व्यक्तीने उपवास ठेवल्याने जे नैतिक व आत्मिक लाभ मिळू शकतात ते जर लाखो व कोट्यवधी लोकांनी मिळून उपवास ठेवल्यास लाखो व कोट्यवधी पटीने त्यात अधिक वाढ होते.

रमजान महिना संपूर्ण वातावरणात पुण्य व ईशभीरूतेचा संचार करतो. संपूर्ण समाजात जणू ईशभीरूतेची शेती हिरवीगार होऊन डोलू लागते. प्रत्येकजण केवळ स्वतः पापापासून वाचण्याचा प्रयत्न करीत नाही तर, त्याच्यात काही दोष असल्यास दुसरे अनेक बंधु जे त्याच्याप्रमाणेच उपवास ठेवणारे आहेत, त्याचे पाठीराखे बनतात. प्रत्येक माणसाला उपवास ठेवून पाप करण्याची लाज वाटते आणि प्रत्येकाच्या मनात आपोआपच अशी भावना जागृत होते की काही कल्याणकारी कार्य करावे, एखाद्या गरीबाला जेवू घालावे, एखाद्या विवस्त्र माणसाला कपडे द्यावेत, एखाद्या आपत्तीग्रस्ताला साहाय्य करावे, एखाद्या जागी जर एखादे पुण्यकार्य चालले असेल तर त्यात भाग घ्यावा आणि जर कोठे जाहीररित्या पाप होत असेल तर त्याला आळा घालावा. पुण्याकार्य व ईशभीरूतेचे सार्वत्रिक वातावरण निर्माण होते आणि सदाचाराच्या उत्कर्षाचा तसा मोसम येतो जसा प्रत्येक धान्याचा मोसम आल्यावर ते धान्य विपुल प्रमाणात येते व सर्वत्र शेती बहरलेली दिसू लागते. म्हणूनच पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्माविले,

"मनुष्याचे प्रत्येक कर्म अल्लाहपाशी काही न काही वाढते, एक पुण्य कर्म दहा पटींपासून सातशे पटींपर्यंत वाढते. परंतु महान अल्लाह फर्मावितो की उपवास या मर्यादेबाहेर आहे. ते विशेषकरून माझ्यासाठी आहे आणि मी त्याचा हवा तितका मोबदला देतो." (हदीस)

या हदीसवरून असे कळते की पुण्यकर्म करणाऱ्याची इच्छा व पुण्यकर्माच्या परिणामांच्या दृष्टीने सर्व कर्मे वाढतात. त्यांच्या उत्कर्षाची एक मर्यादा आहे. परंतु उपवासाच्या विकासाची व उत्कर्षाची कोणतीही मर्यादा नाही. ज्याअर्थी रमजान सत् व कल्याणाच्या वाढीचा मोसम आहे आणि या मोसमात एकच मनुष्य नव्हे तर कोट्यवधी मुस्लिम मिळून या पुण्याईच्या बागेला पाणी देतात त्याअर्थी ही अमर्याद वाढू शकते. जितक्या जास्त सदिच्छेने या महिन्यात कर्म कराल, जितका जास्त समृद्धीचा लाभ

घ्याल आणि आपल्या अन्य बांधवांना लाभ द्याल आणि जितके जास्त या महिन्याचे परिणाम नंतरच्या अकरा महिन्यांत शिल्लक ठेवाल, तितकीच ही पल्लवित व पुष्पित होईल आणि तिच्या वाढीची कसलीही मर्यादा राहणार नाही. जर तुम्ही स्वत:च्या कर्माने याला मर्यादित केले तर हा तुमचा दोष होय.

उपवासाचे परिणाम आता कोठे आहेत?

उपवासाच्या या प्रभाव व परिणामाबद्दल ऐकून आपल्यापैकी प्रत्येकजणाच्या मनात हा प्रश्न उत्पन्न होईल की हे प्रभाव आज कोठे आहेत? आम्ही उपवास ठेवतो व नमाजसुद्धा अदा करतो; परंतु हे परिणाम जे तुम्ही सांगता ते प्रकट होत नाहीत. याचे कारण तर मी आपल्याला अगोदरच सांगून टाकले आहे आणि ते असे की इस्लामच्या भागांना वेगवेगळे करून टाकल्यानंतर आणि अनेक नवीन गोष्टी त्यात मिसळल्यानंतर आपण त्या परिणामांची अपेक्षा करू शकत नाही जे संपूर्ण व्यवस्था एकत्रित जोडलेल्या स्थितीत असल्यास दिसू शकतात. याशिवाय दुसरे कारण असे आहे की उपासनेसंबंधी आपला दृष्टिकोन बदलला आहे. आता आपण असे समजता की केवळ सकाळपासून संध्याकाळपर्यंत काहीही न खाणे किंवा न पिण्याचे नाव उपासना आहे आणि जर हे कार्य केले तर उपासना पूर्ण झाली. अशाप्रमाणेच आपण अन्य उपासनांच्या केवळ बाह्य स्वरूपाला उपासना समजता आणि उपासनेचा खरा आत्मा जो आपल्या प्रत्येक कर्मात असला पाहिजे त्यापासून सामान्यपणे आपल्यापैकी ९९ टक्के नव्हे त्यापेक्षाही अधिक लोक गाफील आहेत. याच कारणामुळे या उपासना आपला पूर्ण फायदा दाखवीत नाहीत, कारण इस्लाममध्ये इच्छा व विवेक आणि समजुतदारपणावरच सर्व काही अवलंबून आहे. अल्लाहने इच्छिले तर आगामी प्रवचनात या विषयाचे पूर्ण स्पष्टीकरण करीन.

उपवासाचा मूळ उद्देश

प्रत्येक कामाचा एक उद्देश

बंधुनो! प्रत्येक काम जो मनुष्य करतो त्यात दोन गोष्टी अवश्य असतात. एक गोष्ट तर तो उद्देश आहे ज्याच्यासाठी काम केले जाते आणि दुसरी गोष्ट त्या कामाची विशेष कृती आहे जी हा उद्देश प्राप्त करण्यासाठी अवलंबिली जाते. उदाहरणार्थ- जेवण करण्याची कृती घ्या. जेवण्याचा आपला उद्देश जिवंत राहणे व शरीराची शक्ती टिकवून ठेवणे होय. हा उद्देश प्राप्त करण्याची पद्धत अशी आहे की आपण अन्नाचा घास बनविता, तोंडात घालता, दाताने चावता आणि घशाखाली उतरविता. हा उद्देश प्राप्त करण्यासाठी सर्वांत अधिक उपयुक्त व सर्वांत अधिक योग्य पद्धत हीच होती, म्हणून आपण ही अवलंबिली. परंतु आपल्यापैकी प्रत्येक मनुष्य जाणतो की मूळ गोष्ट तो उद्देश आहे ज्याच्याकरिता जेवण केले जाते. खाण्याची ही पद्धत नव्हे जर एखाद्या माणसाने लाकडाचा भुसा किंवा राख अथवा माती घेऊन त्याचे घास बनविले, दाताने चावून घशाखाली उतरविले तर आपण त्याला काय म्हणाल? असेच ना की त्याचे डोके फिरले आहे! ते अशासाठी की तो मूर्ख खाण्याचा मुख्य उद्देश जाणत नाही आणि त्याचा असा गैरसमज आहे की केवळ खाण्याच्या कृतीमधील या चार कृती करण्याचेच नाव जेवण करणे होय. अशाप्रकारे तुम्ही त्या माणसालादेखील वेडा ठरवाल जो जेवल्यानंतर ताबडतोब घशात बोटे घालून वांत्या करीत असेल व नंतर तक्रार करीत असेल की जेवणाचे जे लाभ सांगितले गेले आहेत ते मला प्राप्तच होत नाहीत तर उलट दिवसेंदिवस मी दुर्बल होत चाललो आहे आणि मृत्यूची वेळ आली आहे. हा आपल्या दुर्बलतेचा दोष भाकरी व जेवणाला देत आहे. वास्तविकत: मूर्खपणा त्याचा स्वत:चा आहे. तो आपल्या मूर्खपणामुळे असे समजला की भोजन करण्याच्या कामात जितक्या क्रिया कराव्या लागतात त्या केल्यास जीवनशक्ती प्राप्त होते. म्हणून त्याला वाटले की भाकरीचे ओझे पोटात कशाला ठेवावे? ते काढून फेकून द्यावे आणि पोट हलके करावे. भोजन करण्यातील सर्व क्रिया मी तर केलेल्याच आहेत. हा मूर्खपणाचा विचार जो त्याच्या मनात पक्का झाला आणि त्याप्रमाणे तो वागला, त्याची शिक्षादेखील त्यालाच भोगावी लागली. त्याला कळावयास हवे होते की जोपर्यंत पोटात जाऊन भाकरीचे पचन होत नाही व त्यापासून रक्त तयार होऊन शरीरात ते पसरत नाही

तोपर्यंत जीवनशक्ती प्राप्त होणे शक्य नाही. जेवण्याच्या दृश्य कृती जरी आवश्यक आहेत, कारण त्यांच्याशिवाय भाकरी पोटात पोहचू शकत नाही, तरी केवळ या दृश्य कृती केल्याने भागणार नाही. या कृतींमध्ये जादू भरलेली नाही की त्या केल्याने जादुई पद्धतीने माणसाच्या शिरातून रक्त वाहू लागेल. रक्तनिर्मितीसाठी तर अल्लाहने जो कायदा बनविला आहे त्याच्याप्रमाणेच ते निर्माण होईल, तो कायदा मोडाल तर स्वत:चा विनाश करू घ्याल.

दृश्य गोष्टींना वास्तविकता समजण्याचे परिणाम

हे उदाहरण जे मी तपशीलवार आपल्यासमोर सांगितले आहे त्यावर जर विचार केला तर आपल्या लक्षात येईल की हल्ली उपासना का परिणामहीन झाल्या आहेत. जसे मी अगोदरसुद्धा अनेकदा सांगितले आहे की सर्वांत मोठी चूक हीच आहे की आपण नमाज व उपवासातील कृती व त्यांच्या बाह्य रूपालाच खरी उपासना समजलो आहोत आणि या चुकीच्या समजुतीत गुरफटून गेलो आहोत. ज्याने या कृती पूर्णपणे केल्या, बस्स त्याने अल्लाहची उपासना केली. आपले उदाहरण त्या माणसासारखे आहे जो भोजन करण्याच्या चारी कृती म्हणजे घास बनविणे, तोंडात घालणे, चावणे व घशाखाली उतरविणे, यांना जेवण करणे असे मानतो आणि असा विचार करतो की ज्याने या चारी कृती केल्या त्याने भोजन केले आणि जरी त्याने या कृती करून माती, दगड आपल्या पोटात भरले का असेना अथवा भोजन करून ताबडोतब वांती का केलेली असेना, त्याला भोजनाचे फायदे मिळालेच पाहिजेत. जर खरोखर आपण या मूर्खपणाच्या आहारी गेला नसाल तर मला सांगा की हे असे कसे घडते की उपवास करणारा मनुष्य जो सकाळपासून संध्याकाळपर्यंत अल्लाहच्या उपासनेत निमग्न असतो तो या उपासनेच्या स्थितीत कसे खोटे बोलतो? निंदा कशी करतो? लहान-लहान गोष्टीवरून कसा भांडतो? त्याच्या तोंडातून का शिव्या निघतात? तो लोकांचा हक्क कसा हडप करू शकतो? निषिद्ध कसे खातो व निषिद्ध खाऊ घालण्याचे काम कसे करतो? आणि ही सर्व कामे करूनदेखील मी अल्लाहची उपासना केली आहे असे कसे समजतो? याचे उदाहरण त्या माणसासारखे नाही का की जो राख माती खातो आणि केवळ जेवण्याच्या चार कृती करून असे समजतो की यालाच भोजन करणे असे म्हणतात?

रमजाननंतर पुन्हा स्वैराचार

मग मला असे सांगा की रमजान महिन्यात सुमारे ३६० तास अल्लाहची उपासना केल्यानंतर जेव्हा तुम्ही त्यातून मोकळे होता तेव्हा या संपूर्ण उपासनेचे सर्व परिणाम पुढचाच महिना म्हणजे शव्वालच्या पहिल्याच तारखेला कसे नामशेष होतात? हिंदू लोक आपल्या सणाच्या वेळी जे काही करतात त्याच सर्व गोष्टी तुम्ही ईदच्या काळात करता. पराकोटीची गोष्ट अशी की शहरात तर ईदच्या दिवशी व्यभिचार, दारू पिणे व जुगार खेळण्याच्या घटनासुद्धा घडतात. काही अत्याचारी तर मी असेदेखील पाहिले आहेत की जे रमजान महिन्यात दिवसा उपवास ठेवतात आणि रात्री दारू पितात व व्यभिचार करतात. अल्लाहची कृपा आहे की सामान्य मुस्लिम इतके तर बिघडलेले नाहीत. परंतु रमजान महिना संपल्यानंतर आपल्यापैकी असे कितीजण आहेत की ज्यांच्यात ईदच्या दुसऱ्या दिवशीदेखील ईशभीरूता व भक्तीची चिन्हे शिल्लक राहतात? अल्लाहच्या कायद्यांचे उल्लंघन करण्यात काही कसर ठेवली जाते का? सत्कर्म करण्यात किती भाग घेतला जातो? अहंकारात काही कमतरता येते काय?

उपासनासंबंधी चुकीच्या कल्पनेचा परिणाम

थोडा विचार करा की अखेर याचे कारण काय आहे? मी विश्वासपूर्वक सांगतो याचे कारण केवळ असे आहे की आपल्या डोक्यात उपासनेचा चुकीचा अर्थ बसलेला आहे. तुम्ही असे समजता की पहाटेपासून संध्याकाळपर्यंत काहीही न खाण्या-पिण्याचे नाव उपवास (रोजा) आहे आणि हीच उपासना होय. म्हणून उपवासाचे तर तुम्ही पुरेपूर रक्षण करता. अल्लाहचे भय तुमच्या मनात इतके अधिक असते की ज्या गोष्टीने उपवास मोडण्याची थोडीदेखील शंका असेल त्यापासून तुम्ही दूर राहता. प्राण कंठाशी आले तरी उपवास मोडण्याची तयारी नसते. परंतु आपल्याला हे माहीत नाही की हे भुकेने व तहानेने त्रस्त राहणे मुळात उपवास नाही तर हे उपासनेचे स्वरूप आहे आणि हे स्वरूप निश्चित करण्याचा उद्देश असा आहे की तुमच्या मनात अल्लाहचे भय व त्याच्याबद्दल प्रेम निर्माण व्हावे, तुमच्यात इतकी शक्ती निर्माण व्हावी की ज्या गोष्टीत खूप फायदे असतील, परंतु अल्लाह त्याने नाराज होत असेल तर आपल्या मनावर नियंत्रण ठेवून त्यापासून दूर राहावे. ज्या गोष्टीत सर्व प्रकारचे धोके व नुकसान असतील, परंतु त्याने अल्लाह प्रसन्न होत असेल तर आपल्या मनाला त्यासाठी जबरीने तयार करावे. ही शक्ती अशाप्रकारेच निर्माण झाली असती तर तुम्ही उपवासाचा उद्देश

काय आहे हे समजून घेतले असते आणि महिनाभर अल्लाहचे भय व अल्लाहच्या प्रेमाखातर आपल्या मनाच्या इच्छांना आळा घालण्याचा आणि अल्लाहच्या मर्जीप्रमाणे मनाला चालविण्याचा जो सराव केला आहे त्यापासून लाभ घेतला असता. परंतु रमजाननंतर लगेच हा सराव व त्या गुणांना, जे या सरावामुळे उत्पन्न झाले होते, अशाप्रकारे काढून फेकून देता जसे जेवल्यानंतर एखादा मनुष्य घशात बोटे घालून वांती करतो. इतकेच नव्हे तर आपल्यापैकी काही लोक उपवास सोडल्यानंतर लगेच दिवसभर केलेली भक्ती ओकून टाकतात. मग आता आपणच सांगा की रमजान व त्यातील उपवास काही जादू तर नाहीत की त्यांच्या केवळ बाह्य स्वरूपाला आकार दिल्याने ते सामर्थ्य प्राप्त व्हावे जे खरोखर उपवासामुळे प्राप्त होणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे भाकरी खाल्ल्याने शारीरिक शक्ती तोपर्यंत निर्माण होऊ शकत नाही जोपर्यंत ती पोटात जाऊन तिचे पचन होत नाही व रक्त बनून शरीरातील प्रत्येक शिरेत पोहचत नाही. अशाप्रकारेच मनुष्य उपवासाचा उद्देश पूर्णपणे समजत नाही आणि आपल्या मन व डोक्यात त्यास उतरण्याची आणि विचार, इच्छा व कृती सर्वांवर प्रभावित होण्याची संधी देत नाही.

ईशभीरू बनण्याचे साधन उपवास

हेच कारण आहे की महान अल्लाहने उपवास ठेवण्याची आज्ञा दिल्यावर फर्माविले- ''लअल्लकुम तत्तकून'' म्हणजे तुमच्यावर उपवास अनिवार्य केला जात आहे, कदाचित त्यामुळे तुम्ही ईशभीरू व भक्त बनावे. असे फर्माविले नाही की त्यामुळे तुम्ही अवश्य ईशभीरू व भक्त बनाल. त्याला कारण असे की उपवासाचा हा परिणाम तर माणसाच्या विवेक व समजुतीवर अवलंबून आहे. ज्याला याचा उद्देश कळेल आणि याच्या माध्यमाने मूळ उद्देश प्राप्त करण्याचा प्रयत्न करील तो तर थोडाबहुत ईशभीरू बनेल. परंतु ज्याला उद्देशच कळाला नाही आणि त्याने तो प्राप्त करण्याचा प्रयत्नदेखील केला नाही, त्याला कोणताही लाभ होण्याची आशा नाही.

उपवासाचे मूळ उद्देश

१. असत्यापासून दूर राहणे

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी विभिन्न प्रकारे उपवासाच्या मूळ उद्देशांकडे लक्ष आकर्षित केले आहे आणि हे समजावून दिले आहे की उद्देशाकडून निश्चिंत होऊन उपाशी व तहानेला राहणे काही लाभदायक नाही म्हणून फर्माविले-

"जर कोणी खोटे बोलणे व खोट्या गोष्टीची अंमलबजावणी करणेच सोडले नाही तर त्याच्या जेवण करण्यावर व पाणी पिण्यावर प्रतिबंध घालण्याची अल्लाहला काहीही गरज नाही." (हदीस)

दुसऱ्या हदीसमध्ये पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्माविले,

"बरेचसे उपवास करणारे असे आहेत की उपवासापासून भूक आणि तहानेशिवाय त्यांच्या पदरी काहीही पडत नाही आणि रात्री उभे राहणारे (नमाजमध्ये) असे अनेक आहेत की या उभे राहण्याने जागरणाशिवाय त्यांच्या पदरी काहीही पडत नाही." (हदीस)

या दोन्ही हदीसींचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. यावरून स्पष्टपणे कळते की केवळ उपाशी व तहानलेला राहणे म्हणजे उपासना नव्हे, तर खऱ्या उपासनेचे ते साधन आहे आणि खरी उपासना अल्लाहच्या भयाने अल्लाहच्या कायद्याचे उल्लंघन न करणे होय आणि अल्लाहवर प्रेम असल्यामुळे त्या प्रत्येक कामासाठी धाव घ्यावी ज्यात अल्लाहची प्रसन्नता आहे आणि शक्यतो स्वार्थ व अहंकारापासून दूर राहावे. या उपासनेपासून जो मनुष्य गाफील राहिला त्याने आपल्या पोटाला विनाकारण भूक व तहानेचा त्रास दिला. महान अल्लाहला याची काय गरज पडली होती की त्याने बारा-चौदा तासांपर्यंत त्याला जेवण्या-खाण्यापासून वंचित ठेवावे?

२. श्रद्धा व आत्मपरीक्षण

उपवासाच्या खऱ्या उद्देशाकडे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी लक्ष आकर्षित केले आहे,

"ज्याने श्रद्धापूर्वक व आत्मपरीक्षणासह उपवास ठेवला त्याचे मागील सर्व पाप माफ केले गेले." (हदीस)

ईमानचा अर्थ असा आहे की अल्लाहसंबंधी एखाद्या मुस्लिमाची जी श्रद्धा असणे आवश्यक आहे ती श्रद्धा डोक्यात पूर्णपणे ताजी ठेवावी. 'इहतिसाब'चा अर्थ असा आहे की माणसाने अल्लाहच्याच प्रसन्नतेचा याचक राहावे आणि नेहमी त्याने आपले विचार व आपल्या कृत्यावर दृष्टी ठेवावी की एखादे वेळी तो अल्लाहच्या प्रसन्नतेविरूद्ध तर चालत नाही ना? या दोन्ही गोष्टी लक्षात ठेवून जो मनुष्य रमजान महिन्याचे सर्व उपवास ठेवील तो आपल्या पूर्वीच्या पापाची क्षमा प्राप्त करून घेईल. त्याला कारण असे की तो एकेकाळी बंडखोर व अवज्ञाकारी गुलाम होता. आता आपल्या स्वामीसमोर तो पूर्णपणे रुजू झाला आहे. आणि-

''पापाबद्दल पश्चात्ताप करणारा असा आहे जणू त्याने पाप केलेच नव्हते.''

पापापासून वाचण्याची ढाल

दुसऱ्या हदीस (पैगंबरांचे वचन) मध्ये आहे,

''रोजे (उपवास) ढालीप्रमाणे आहेत (ज्याप्रमाणे ढाल शत्रूच्या वारापासून बचाव करण्यासाठी आहे त्याचप्रमाणे उपवाससुद्धा शैतानाच्या वारापासून वाचण्यासाठी आहे.) म्हणून जर एखाद्या माणसाचा उपवास असेल तर त्याने (या ढालीचा उपयोग करून) उपद्रवापासून लांब राहावे. जर एखाद्या माणसाने त्याला शिवी दिली अथवा त्याच्याशी भांडण केले तर त्याने असे सांगावे की हे बंधु! माझा उपवास आहे (माझ्याकडून अशी अपेक्षा ठेवू नकोस की मी या भांडण वगैरे गोष्टीत भाग घेईन).'' (हदीस)

पुण्यकार्याची लालसा

दुसऱ्या हदीसमध्ये पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे की उपवास ठेवला असता माणसाने जास्तीतजास्त पुण्यकार्ये केली पाहिजेत आणि सर्व प्रकारच्या कल्याणकारी कार्यांचा त्याला छंद लागला पाहिजे. अशा स्थितीत विशेषत: त्याच्या मनात दुसऱ्या बांधवांबद्दल सहानुभूतीची तीव्र भावना जागृत झाली पाहिजे, कारण तो भूक व तहानेचा त्रास सहन करून अधिक चांगल्या प्रकारे अनुभव करू शकतो की अल्लाहच्या अन्य गुलामांची दारिद्र्य व संकटात काय स्थिती होत असेल.

माननीय इब्ने अब्बास (रजि.) यांचे कथन आहे की स्वत: पैगंबर मुहम्मद (स.) रमजान महिन्यात अन्य दिवसापेक्षा अधिक दयाळू व प्रेमळ बनत असत.

कोणताही याचक त्या काळात पैगंबरांच्या दारावरून मोकळ्या हाताने जात नसे आणि कोणताही कैदी तुरुंगात डांबलेला राहत नसे.

इफ्तार (उपवास सोडणे) करविण्याचे पुण्य

एका हदीसमध्ये आलेले आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्माविले,

"ज्याने रमजान महिन्यात एखाद्या माणसाचा उपवास सोडविला तर हे कर्म त्याच्या पापांच्या क्षमेचे व त्याच्या मानेला अग्नीपासून सोडविण्याचे साधन बनेल आणि त्याला तितक्याच पुण्याईचा लाभ होईल जितका त्या उपवास ठेवणाऱ्याला उपवास ठेवल्याबद्दल पुण्य प्राप्त होईल आणि उपवास ठेवणाऱ्याच्या पुण्याईत कसलीही कमी केली जाणार नाही."

-०- समाप्त -०-